सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १८ जुलै २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ९५ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## सवलती रद्द होणार ?

मुंबई : धर्मांतरानंतरही अनुसूचित जमातीचे (आदिवासी) सर्व लाभ मिळवणाऱ्या व्यक्तींच्या शासकीय सोयी-सवलती रद्द कराव्यात का, यावर आता राज्य सरकार अत्यंत गांभीर्याने विचार करत आहे. ख्रिश्र्चन किंवा इतर धर्मात धर्मांतर केलेल्या आदिवासींच्या सवलतींबाबत राज्याचे सर्वसमावेशक धोरण ठरवण्यासाठी सरकारने २७ जणांची उच्चस्तरीय समिती गठित केली असून, समितीच्या अहवालानंतर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

पावसाळी अधिवेशनात याबाबतचा मुद्दा उपस्थित झाला होता. नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात ख्रिश्र्चन धर्मगुरू आणि मिशनऱ्यांकडून प्रलोभने देऊन मोठ्या प्रमाणावर आदिवासींचे धर्मांतर केले जात असल्याचा मुद्दा भाजपचे आमदार अनुप अग्रवाल आणि इतर सदस्यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे सभागृहात उपस्थित केला होता. या लक्षवेधीवरील चर्चेदरम्यान आमदारांनी, धर्मांतर करणाऱ्या व्यक्तींना अनुसूचित जमाती किंवा अनुसूचित जातीच्या नात्याने मिळणाऱ्या सरकारी सवलती, आरक्षण आणि इतर लाभ तातडीने रद्द करण्यात यावेत, अशी आग्रही मागणी केली होती.

## मत्स्यसंपदा योजनेची अंमलबजावणी करा

मुंबई : मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून राज्यातील अधिकाधिक मच्छिमारांना योजनांचा लाभ मिळावा, यासाठी व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी दिले. मंत्रालयात आयोजित राज्यस्तरीय आढावा बैठकीत त्यांनी विभागातील अधिकाऱ्यांना विविध योजनांच्या अंमलबजावणीचा वेग वाढविण्याच्या सूचना केल्या. या बैठकीला पदुम सचिव रामास्वामी एन., मत्स्यआयुक्त प्रेरणा देशभ्रतार, महाराष्ट्र मत्स्योद्योग महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले, राज्यातील प्रादेशिक उपायुक्त, सहाय्यक आयुक्त आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत विभागीय मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रांच्या उभारणीचाही आढावा घेण्यात आला. पुणे आणि नागपूर येथे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याची प्रक्रिया सुरू असून, मुंबई विभागातील वसई आणि नागपूर विभागातील गडचिरोली येथेही प्रशिक्षण केंद्र उभारणीच्या कामाला गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## पालेभाज्यांचे भाव गगनाला

नाशिक : पावसाने ओढ दिल्यामुळे भाजीपाल्याची आवक घटली असून त्याचा थेट परिणाम पालेभाज्यांच्या दरावर झाला आहे. नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीतील लिलावात कोथिंबिरीच्या एका जुडीला तब्बल २८५ रुपयांचा उच्चांकी दर मिळाला. त्यामुळे सर्वसामान्यांच्या जेवणातील कोथिंबीर आता महागडी ठरू लागली आहे. यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. जून महिना जवळपास कोरडा गेल्यानंतर जुलैच्या पहिल्या आठवड्यात जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाला. आतापर्यंत नाशिक जिल्ह्यात ३५६.६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून, जुलैच्या पहिल्या आठवड्यात ११३.६ मिलिमीटर पाऊस झाला आहे. १७ जुलैपर्यंत जिल्ह्यात सरासरी ९४.५ टक्के पावसाची नोंद झाली आहे.मात्र, पावसाचे असमान वितरण आणि काही भागातील पावसाच्या ओढीमुळे भाजीपाला पिकांचे नुकसान झाले. परिणामी बाजारात भाजीपाल्याची आवक कमी झाली आणि दरात मोठी वाढ झाली.

## प्रतिबंधित गुटखा जप्त

मुंबई : मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील चारोटी टोलनाका येथे कासा पोलिसांनी केलेल्या कारवाईत प्रतिबंधित गुटखा, सुगंधित पानमसाला व तंबाखूचा साठा जप्त करत एका तरुणाला अटक केली

# पहिल्या हायड्रोजन ट्रेनला पंतप्रधानांनी दाखवला हिरवा झेंडा



वृत्तसंस्था

नवी दिल्ली : हरियाणातील जींद रेल्वेस्थानकावरून देशातील पहिल्या हायड्रोजन इंधन सेलवर (फ्यूल सेल) चालणाऱ्या प्रवासी ट्रेनला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि. १६) हिरवा झेंडा दाखवला. ही ट्रेन उत्तर रेल्वेच्या जींद-सोनिपत रेल्वे मार्गावर धावली. यामुळे देशात स्वच्छ ऊर्जे वर आधारित रेल्वे वाहतुकीची सुरुवात झाली आहे.ही ट्रेन पारंपरिक इलेक्ट्रिक ट्रेनप्रमाणे ओव्हरहेड वीजवाहिनीवर अवलंबून नाही. यामध्ये बसवण्यात आलेल्या 'प्रोटॉन एक्स्चेंज मेम्ब्रेन फ्यूल सेल' मध्ये हायड्रोजन आणि वातावरणातील ऑक्सिजन यांच्यातील रासायनिक प्रक्रियेतून वीजनिर्मिती होते. त्यावर ही ट्रेन चालते. या प्रक्रियेत केवळ पाण्याची वाफ (जलवाष्प) आणि उष्णता बाहेर पडते; त्यामुळे कार्बनचे उत्सर्जन किंवा धूर अजिबात होत नाही.रेल्वे मंत्रालयाच्या माहितीनुसार, ट्रेनमध्ये हायड्रोजन गळती, अतिउष्णता, आग आणि धूर यांचा त्वरित शोध घेणारी रेल्वेची बहुस्तरीय (मल्टी-लेयर) सुरक्षा प्रणाली बसवण्यात आली आहे. अशी परिस्थिती उद्भवल्यास हायड्रोजनचा पुरवठा आपोआप बंद होतो. ट्रेनमध्ये सतत व्हेंटिलेशनची (हवा खेळती राहण्याची) व्यवस्था आहे, जेणेकरून किरकोळ गळती झाल्यास हायड्रोजन वातावरणात मिसळून सुरक्षितपणे नाहीसा होईल. लोको पायलटच्या सुरक्षेसाठी विशेष केबिन तयार करण्यात आले आहे. यात संपूर्ण सिस्टीमवर रिअल टाईम लक्ष ठेवणारी डिजिटल स्क्रीन आणि आपत्कालीन परिस्थितीत ट्रेन सुरक्षित ठिकाणी नेण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध आहे.रेल्वे मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, जींद-सोनिपत प्रकल्पातून मिळालेल्या अनुभवाच्या आधारे भविष्यात कालका शिमलासारख्या हेरिटेज रेल्वे मार्गावरही हायड्रोजन तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या शक्यतांचा अभ्यास केला जाईल. भारतीय रेल्वेनुसार, ब्रॉडगेज नेटवर्कचे ९९ टक्क्यांपेक्षा जास्त विद्युतीकरण झाले आहे. स्वच्छ आणि शाश्वत रेल्वे वाहतुकीच्या दिशेने हायड्रोजन ट्रेन हे पुढचे महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

# संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा अजेंडा जाहीर



वृत्तसंस्था

नवी दिल्ली : केंद्र सरकारने संसदेच्या पावसाळी अधिवेशनात मांडण्यात येणाऱ्या विधेयकांची यादी जाहीर केली आहे. या यादीत पाच नवीन विधेयकांचा समावेश करण्यात आला असून, लोकसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेशी घटनादुरुस्ती विधेयकाचा मात्र यात समावेश करण्यात आलेला नाही.

सरकारने पावसाळी अधिवेशनात पुढील पाच नवीन विधेयके मांडण्याची तयारी केली आहे.आयकर (दुरुस्ती) विधेयक, २०२६ - अध्यादेशाच्या जागी कायदा करण्यासाठी. सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) दुरुस्ती विधेयक, २०२६ - सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढविण्यासाठी.जन्म आणि मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) विधेयक, २०२६ - उशिराने नोंदणी करणाऱ्यांसाठी अधिक कडक तरतुदी करण्याचा प्रस्ताव.राष्ट्रीय सन्मान अपमान प्रतिबंध (दुरुस्ती) विधेयक, २०२६ - 'वंदे मातरम्'चा जाणूनबुजून अपमान करणे किंवा त्यात अडथळा आणणे दंडनीय गुन्हा ठरवण्याचा प्रस्ताव.सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास दुरुस्ती विधेयक, २०२६. या अधिनेशनात १३०वे आणि १३१वे घटनादुरुस्ती विधेयक समाविष्ट करण्यात आलेले नाही.१३०वे घटना दुरुस्ती विधेयक : पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा इतर कोणतीही सार्वजनिक पदावरील व्यक्ती ३० दिवस तुरुंगात राहिल्यास त्यांचे पद आपोआप रद्द करण्याचा प्रस्ताव.१३१वे घटनादुरुस्ती विधेयक : महिलांसाठी आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव.

# भावाची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले, सुप्रिया सुळेंचं विलीनीकरणावर भावनिक वक्तव्य



तभा वृत्तसेवा

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीगाठींवरुन दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांना उधाण आलं. विशेष म्हणजे जयंत पाटील यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली त्याचवेळी 'वर्षा' बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे देखील उपस्थित होते, अशी चर्चा होती. या सर्व चर्चांनंतर आता खासदार सुप्रिया सुळे यांनी विलीनीकरणाबाबत महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधननंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणाबाबत कोणतीही बैठक झाली नव्हती, असं सुनील तटकरे वारंवार म्हणाले होते. पण आज झालेल्या पत्रकार परिषदेत सुनील तटकरे यांनी अजित पवार हयात असताना दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत चर्चा झाली होती असं सुनील तटकरे यांनी मान्य केलं आहे. सुनील तटकरेयांच्या वक्तव्याबाबत खासदार सुप्रिया सुळे यांना प्रश्न्न विचारण्यात आला. सुप्रिया सुळे यांनी दिल्लीत आज जंतरमंतर मैदानात उपोषणाला बसलेले सोनम वांगचुक यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना विलीनीकरणाच्या प्रश्न्नावर भावनिक प्रतिक्रिया दिली. माझा भाऊ आज राहिलेला नाही. त्यामुळे माझ्या भावाबद्दल आणि झालेल्या चर्चेबद्दल याला आता पूर्णविराम दिला आहे. माझा भाऊ जावून पाच महिने झाले आहेत. आम्ही कुटुंब म्हणून कुठेतरी सावरतोय. माझ्या भावाची जी शेवटची इच्छा होती की, दोन्ही पक्ष एकत्र येवून गुण्यागोविंदाने सर्वांनी राज्याची आणि देशाची सेवा करावी. माझ्या भावाची इच्छा पूर्ण करण्याची इच्छा अजितदादा असतानाही होती आणि अजित दादा गेल्यावरही होती. पण आता तशी काही भावना त्या बाजूने येत नाहीय. त्यामुळे माझ्या मनात आणि आमच्या संघटनेत त्या गोष्टीला आम्ही पूर्णविराम दिला, असंसुप्रिया सुळेयांनी स्पष्ट केलं.ज्या दिवशी अजितदादा यांचं निधन झाल्यानंतर आमच्या काही नेत्यांनी अजितदादांची शेवटची इच्छा बोलून दाखवली. त्यावेळी समोरच्या पक्षाच्या नेत्यांनी अशी काही चर्चा झालीच नाही, असं मत मांडलं. हे ऐकून आम्हाला प्रचंड दु:ख आणि वेदना झाल्या होत्या, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. एकतर माझा भाऊ गेला होता आणि त्याची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी आमचे प्रयत्न होते. कारण तो प्रस्ताव माझ्या भावाचा होता. त्यामुळे आमच्याकडून तो विषय त्याचदिवशी संपवला. आम्ही स्वाभिमानी लोकं आहोत. आमचा भाऊ आज राहिला नाही. त्यामुळे ठिक आहे. मला ज्या दिवशी लक्षात आलं की, अजितदादांची इच्छा पूर्ण करण्यास समोरचे नेते रास्त नाहीत. मी पूर्णविराम दिला. त्यानंतर आम्ही राज्य आणि देशाच्या सेवेसाठी लागलो आहोत, अशी भावनिक प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.

# अकोल्यात नवविवाहितेची आत्महत्या



तभा वृत्तसंस्था

अकोला : अकोला शहरातील डाबकी रोड परिसरात लग्न झालेल्या नवविवाहितेने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पल्लवी प्रदीप मोरे असं आत्महत्या केलेल्या महिलेचं नाव असून या आत्महत्येप्रकरणी अकोल्यातील डाबकी रोड पोलिसांनी कारवाई करत पतीसह सासरच्या सहा जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी मृत विवाहितेचे सासरे दयाराम मोरे यांना अटक केली असून, इतर आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अकोल्यातील डाबकी रोड परिसरात राहणाऱ्या पल्लवी प्रदीप मोरे या महिलेने त्यांच्या राहत्या घरात गळफास घेत आपलं जीवन संपवलं. मुलीने आत्महत्या केल्याची माहिती मिळताच माहेरच्या लोकांना मोठा धक्का बसला. त्यानंतर माहेरच्या नातेवाईकांनी डाबकी रोड पोलीस ठाण्यात धाव घेत याबाबतची तक्रार नोंदविली. लग्नानंतर पल्लवीला सातत्याने मानसिक त्रास देत सासरच्या कुटुंबाकडून तिचा छळ केला जात असल्याचा आरोप पल्लवीच्या माहेरच्या व्यक्तींनी केला आहे. या छळामुळेच पल्लवीने टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

# जैश – ए– मोहम्मदच्या अतिरेक्यांना पकडले



अहमद गाजीवाला | इब्राहिम हुसैन घाघा | जकारिया दुर्रानी | बिलाल मोहम्मद

मुदस्सिर गाजीवाला | मुफ्ती फौजान | मोहम्मद अब्दुल | मोहम्मद अमीन शेरा

वृत्तसंस्था

गांधीनगर : दहशतवादी विरोधी पथकाने गुजरातमध्ये मोठी कारवाई केली आहे. गुजरातच्या वेगवेगळ्या शहरांमधून एटीएसने जैश - ए - मोहम्मदशी संबंधीत पाच आणि इतर संशयितांना अटक करण्यात आली आहे.अटक केलेल्या आरोपींमध्ये बिलाल आबिद शेरा, मोहम्मद अयुब काडीवाल उर्फ मोहम्मद खडियासन, मोहम्मद शफी मुखी उर्फ शफी चापी, मोहम्मद हसन कराडिया उर्फ हसन हैदरपुरी आणि मोहम्मद असुब सुमासरा उर्फ मोहम्मद खली यांचा समावेश आहे.गुजरात एटीएसने पाकिस्तानातील दहशतवादी संघटना जैश ए मोहम्मद यांच्याशी संबंधित दहशतवाद्यांनी अटक केली आहे त्यांचा संबंध हा गेल्या महिन्यात देशभरातून अटक करण्यात आलेल्या आठ दहशवाद्यांशी आहे.गुजरातमध्ये दहशवादी संघटनेचे स्लीपर सेल तयार करण्यासाठी जैश-ए-मोहम्मद अनेक वर्षांपासून प्रयत्न करत होता. गुजरात दंगलीनंतर इंडियन मुजाहिद्दीनने अहमदाबादमध्ये साखळी बॉम्बस्फोट घडवून आणले होते. त्यात ५० पेक्षा जास्त लोकांची हत्या करण्यात आली. तर २०० पेक्षा जास्त लोक जखमी झाले होते.जैश-ए-मोहम्मद देखील सतत भारतात विशेषकरून गुजरातमध्ये अपली पकड मिळवण्याचा प्रयत्न करत होता. त्यामुळं गुजरातमधील काही लोकांना आपल्याशी जोडून घेत दहशवादी कारवाया वाढवण्याची संधी मिळवण्याचा प्रयत्न झाला होता.एटीएस पोलीस उपाधीक्षक हर्ष उपाध्याय यांनी सांगितलं की आधी अटक केलेल्या ८ दहशतवाद्यांच्या संपर्कात आलेल्या या पाच संशयित युकवांना पोलिसांनी अटक केली आहे.

# वाहतूक पोलिसांना 'सर्व्हिस गन' बाळगणे बंधनकारक पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटलांचं मोठं पाऊल



तभा वृत्तसेवा

नागपूर : नागपूर शहरातील वाहतूक पोलिसांवर वाढत्या हल्ल्यांच्या घटना, नाकाबंदीदरम्यान होणारा प्रतिकार आणि कायदा-सुव्यवस्थेची आव्हाने लक्षात घेऊन नागपूर पोलिस आयुक्त विश्र्वास नांगरे पाटील यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे शहरातील वाहतूक शाखेतील पात्र अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ड्युटीदरम्यान 'सर्व्हिस गन' बाळगणे अनिवार्य करण्यात आले आहे.

या आदेशामुळे वाहतूक पोलिसांच्या सुरक्षेला बळ मिळणार असून, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने प्रतिसाद देणे अधिक प्रभावी होणार आहे. नागपूर शहरातील प्रमुख चौकांमध्ये नाकाबंदी, विशेष तपासणी मोहीम, ड्रंक अँड ड्राईव्ह कारवाई तसेच वाहतूक नियंत्रणादरम्यान वाहतूक पोलिसांना अनेकदा गुन्हेगार, संशयित किंवा वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांच्या विरोधाला सामोरे जावे लागते. काही घटनांमध्ये पोलिसांवर धक्काबुक्की, मारहाण तसेच जीवघेणे हल्ले झाल्याचे प्रकार झाले आहे.या आदेशानुसार ड्युटीवर असताना पात्र वाहतूक पोलिसांनी लाठीसोबतच 'सर्व्हिस गन'ही सोबत ठेवणे आवश्यक राहणार आहे. मात्र, शस्त्राचा वापर केवळ अत्यावश्यक आणि कायदेशीर परिस्थितीतच करण्याच्या आणि नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या निर्णयामुळे पोलिसांच्या आत्मसंरक्षण क्षमतेत वाढ होण्याबरोबरच गुन्हेगारांवरही प्रतिबंधात्मक परिणाम होईल. यापूर्वी पोलिस आयुक्तांनीनागपूरवाहतूक शाखेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ड्युटीदरम्यान 'नीट अँड क्लीन' राहण्याचे निर्देश दिले होते. स्वच्छ गणवेश, शिस्तबद्ध वर्तन आणि नागरिकांशी सौजन्यपूर्ण संवाद यावर भर देण्यात आला होता. यासोबतच काही दिवसांपूर्वी पोलिस आयुक्तांनी शहरातील डीसीपी, एसीपी आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षकांनाही ड्युटीदरम्यान 'सर्व्हिस रिव्हॉल्व्हर' सोबत ठेवण्याचे निर्देश दिले होते. गेल्या काही महिन्यांत पोलिसांवर झालेल्या हल्ल्यांच्या घटनांनंतर संपूर्णपोलिसदलाच्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला होता. त्यानंतर टप्प्याटप्प्याने विविध शाखांतील अधिकाऱ्यांसाठी सुरक्षा उपाय योजना अधिक कडक करण्यात येत आहेत.नागपूर शहरात मंजूर पदसंख्या ८४३ असली तरी प्रत्यक्षात दररोज सुमारे ५२० वाहतूक पोलिस रस्त्यावर वाहतूक नियंत्रण, नाकाबंदी आणि विशेष मोहिमांमध्ये कार्यरत असतात. शहरातील २० लाखांहून अधिक वाहनांचा ताण आणि १७१ सिग्नलयुक्त चौकांवरील जबाबदारी लक्षात घेता वाहतूक पोलिसांवरील कामाचा ताणही मोठा आहे. अशा परिस्थितीत त्यांच्या सुरक्षेसाठी घेतलेला हा निर्णय पोलिस दलासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, शहरातील कायदा-सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्यासही त्याची मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कोट्यवधी खर्चून रेल्वे स्टेशन बांधलं; पण ३ वर्षांत ना ट्रेन थांबली, ना प्रवासी फिरकले !




वृत्तसंस्था

भोपाळ : रेल्वे स्टेशन तयार होऊन ३ वर्षे लोटली आहेत. पण तिथे एखादा प्रवासी येतो, ना एखादी ट्रेन थांबते. या रेल्वे स्टेशनच्या उभारणीसाठी सरकारनं कोट्यवधींचा खर्च केला. फलाटापासून तिकीट खिडक्यांपर्यंत आणि प्रतीक्षागृहापासून स्वच्छतागृहापर्यंत सगळं काही तयार आहे. पण ज्यांच्यासाठी रेल्वे स्थानक उभारण्यात आलं, ते इथे फिरकतच नाहीत. या इथे प्रवासी येतात, ना इथे एखादी ट्रेन थांबते. मध्य प्रदेशची राजधानी भोपाळमध्ये निशातपुरा रेल्वे स्थानक आहे. या स्थानकाच्या उभारणीसाठी ६ कोटींचा खर्च करण्यात आला. पण अद्याप तरी इथे प्रवासी फिरकलेले नाहीत. २०२३ मध्ये रेल्वे स्थानक तयार झालं. भोपाळ जंक्शनवर पडणारा भार हलका करण्याच्या हेतूनं या स्थानकाची निर्मिती करण्यात आली. पण अद्यापपर्यंत तरी या स्थानकावरुन कोणत्याच ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यात आलेला नाही. त्यामुळे हे स्थानक अजूनही प्रवाशांच्या प्रतीक्षेत आहे. दिवसभर इथे शांतता असते. ट्रेन भरधाव वेगात इथून धावतात. पण एकही ट्रेन इथे थांबत नाही.या रेल्वे स्थानकावर एकही प्रवासी येत नाही. रेल्वे स्थानक सुरूच झालेलं नाही. त्यामुळे इथे एकाही कर्मचाऱ्याची नियुक्ती अद्यापपर्यंत झालेली नाही. रेल्वे स्थानक पूर्ण होऊनही ते सुरू का झालेलं नाही, असा प्रश्न्न प्रवाशांना पडला आहे. या स्थानकातून ट्रेन जातात. पण त्या थांबत नाही. त्यामुळे प्रवाशांनादेखील या स्थानकाबद्दल तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न्न पडतात. हे स्थानक प्रवाशांच्या सेवेत कधीपासून येणार, हा त्यातील महत्त्वाचा प्रश्न्न आहे.सोयी सुविधांनी सज्ज असूनही रिकामी असलेल्या रेल्वे स्थानकाचे फोटो समोर येताच रेल्वेच्या अधिकाऱ्यांचं स्पष्टीकरण आलं आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, निरीक्षण, सुरक्षा मंजुरी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि ऑपरेशनशी संबंधित प्रक्रिया अद्यापपर्यंत पूर्ण झालेल्या नाहीत. या सोबतच ड्रेनेज आणि अप्रोच रोडशी संबंधित काही कामं अद्याप शिल्लक आहेत. राहिलेलं काम पूर्ण झाल्यावरच स्थानकात ट्रेन थांबतील आणि ते कार्यान्वित होईल, अशी माहिती रेल्वेकडून देण्यात आली आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कृषी विभागाची मोफत 'डिजीटल शेतीशाळा'

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जुलै : बदलत्या हवामानात शाश्र्वत शेतीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्याच्या उद्देशाने पोकरा आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत 'डिजिटल शेतीशाळा' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवला जात आहे. शेतकरी, महिला शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांनी सहभागी होण्याचे आवाहन विभागीय कृषी सहसंचालकांनी केले आहे.

राहुरी, परभणी, दापोली आणि अकोला कृषी विद्यापीठांतील नामवंत कृषी शास्त्रज्ञ शेतकऱ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत. विशेष म्हणजे, या लाईव्ह सत्रादरम्यान शेतकरी शास्त्रज्ञांना प्रश्र्न विचारून शंकांचे जागेवरच निरसन करून घेऊ शकणार आहेत. ही शाळा संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे मोफत असून, सोमवार ते शनिवार दररोज विविध पिकांसाठी झूमवर सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार बाजरी, सोयाबीन, ख. ज्वारी, कापूस, भुईमूग, भात, राजमा, मका, नाचणी, तूर-मूग-उडीद आणि भाजीपाला या प्रमुख पिकांवर संध्याकाळी ६.१५ आणि ७.३० वाजता तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे.



## विविध वृत्त....

### मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम
### लातूरमध्ये मतदार आणि बीएलओ मदत कक्षाची स्थापना

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १७ जुलै : भारत निवडणूक आयोग आणि महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी घोषित केलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) - २०२६ कार्यक्रमांतर्गत मतदार यादीच्या अचूकतेसाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी भेटी देऊन विविध नमुने भरून घेण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने २३४-लातूर ग्रामीण आणि २३५-लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील मतदार व कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक आणि प्रशासकीय सहाय्यासाठी लातूर तहसील कार्यालय येथे मतदार मदत कक्ष व बीएलओ मदत कक्षाची स्थापना करण्यात आली असून ३० जुलै २०२६ पर्यंत हा कक्ष कार्यरत राहणार असून नायब तहसीलदार (संगायो) परमेश्र्वर कांबळे (मो. ९४२१४००२५१) यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नागरिकांच्या मार्गदर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या मतदार मदत कक्षामध्ये महानगरपालिकेचे कर्मचारी ओंकार बोबले (मो. ९१४६७१५१२३) व अर्जुन कांबळे (मो. ८३९०३५७४८०) तसेच तहसील कार्यालयातील कोतवाल पांढरे वाल्मिक (मो. ९६२३९२४०७८) व तानाजी अडसुळ (मो. ९५८८४५०५७४) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, घरोघरी भेटी देणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना साहाय्य करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या बीएलओ मदत कक्षामध्ये विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाचे कृषी अधिकारी अनंत निकम (मो. ९४२१३७४२७३), महानगरपालिकेचे वैभव काचबावर (मो. ७०२०१४६८६६) आणि तहसील कार्यालयातील कोतवाल आकाश राजपुत (मो. ७३९७८५६९०६) व शिवलिंग थडकर (मो. ९४०३९११४००) हे कामकाज पाहणार आहेत.

### युजीसी नेट परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १७ जुलै : जिल्ह्यातील एका परीक्षा केंद्रावर १७ व १८ जुलै, २०२६ या कालावधीत सीएसआयआर युजीसी नेट परीक्षा जून, २०२६ चे आयोजन करण्यात आले असून, ही परीक्षा सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ६ अशा दोन सत्रांमध्ये घेतली जाणार आहे. या पार्श्र्वभूमीवर परीक्षा सुरळीत व शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी लातूरचे जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरामध्ये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थींशिवाय अन्य पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्रित प्रवेश करण्यास तसेच कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास व शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच परीक्षा कालावधीत केंद्राच्या १०० मीटर परिसरातील सर्व झेरॉक्स सेंटर्स, दुकाने, पानटपऱ्या, टायपिंग सेंटर्स, एसटीडी बुथ आणि ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत.

याशिवाय परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल फोन, सेल्यूलर फोन, ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेऊन जाण्यास बंदी घालण्यात आली असून, कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला किंवा वाहनाला प्रवेश दिला जाणार नाही. हे प्रतिबंधात्मक आदेश १७ व १८ जुलै २०२६ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत लागू राहतील. परीक्षा उपकेंद्रावर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थी, निगराणी अधिकारी आणि पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या शासकीय कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने या आदेशातून वगळण्यात आले आहे.

विविध तक्रारी आणि मागण्या ।। महसुली प्रकरणे, शेतकऱ्यांच्या अडचणींसह विविध प्रश्र्न मांडले, नियमानुसार कार्यवाहीच्या सूचना

## खा. डॉ. शिवाजी काळगे यांच्या जनता दरबाराला मोठा प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जुलै : लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांच्या अध्यक्षतेखाली दि. १६ जुलै २०२६ रोजी शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालयाच्या शासकीय सभागृहात जनता दरबार उत्साहात व लोकसहभागातून पार पडला.

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील नागरिकांच्या विविध शासकीय तक्रारी, समस्या व मागण्या थेट लोकप्रतिनिधी आणि संबंधित प्रशासनासमोर मांडता याव्यात, तसेच त्यांचे तातडीने निराकरण व्हावे, या उद्देशाने या जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. खासदार डॉ. काळगे यांच्या विनंतीनुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने सर्व संबंधित जिल्हा व तालुका स्तरावरील विभागांना उपस्थित राहण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महसूल, कृषि, आरोग्य, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महावितरण, शिक्षण, ग्रामपंचायत, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, पोलिस, भूमी अभिलेख, पशुसंवर्धन तसेच इतर विविध विभागांचे अधिकारी या जनता दरबारास उपस्थित होते.

जनता दरबारात तालुक्यातील नागरिकांनी महसूली प्रकरणे, शेतकऱ्यांच्या अडचणी, विविध शासकीय योजनांतील अडथळे, आरोग्य सुविधा, वीजपुरवठा, ग्रामविकास, ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्र्नांसह अनेक विषयांवरील तक ारी व मागण्या मांडल्या. प्रत्येक नागरिकाचे म्हणणे संयमाने ऐकून खासदार डॉ. काळगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रकरणांची गांभीर्याने दखल घेऊन नियमानुसार तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी शिरूर अनंतपाळ बाभळगाव रस्त्याचे काम, ग्रामीण रुग्णालयातील मनुष्यबळाची कमतरता व पशुवैद्यकीय रुग्णालयात डॉक्टर उपलब्ध करून देणे, पोलिस पाटील पदांची रिक्त पदे, भूमी अभिलेख विभागातील अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी व विभागांतील समन्वय वाढविणे, महावितरणकडून नवीन डीपी बसविणे व विद्यमान डीपीची क्षमता वाढविणे, २०० फूट मर्यादमुळे कृषी सौरपंप योजनेच्या ल ा भ ा त य े ण ा ऱ्या अडचणी, त स े च मटका, लुडो व गुटखा विक्रीसारख्या बेकायदेशीर प्रकारांवर कठोर कारवाई या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, ॲड. संभाजीराव पाटील, ॲड. जयश्रीताई पाटील, डॉ. अरविंद भातांब्रे, जि. प. सदस्य माणिक गायकवाड, पं. स. सदस्य हमीद पटेल, काँग्रेस तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील, यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नागरिकांना तातडीने न्याय मिळवून द्यावा**

खा. डॉ. काळगे म्हणाले की, जनतेच्या समस्या कार्यालयात न राहता थेट प्रशासनासमोर मांडल्या गेल्या पाहिजेत आणि त्यांचे वेळेत निराकरण झाले पाहिजे, हा जनता दरबारामागील मुख्य उद्देश आहे. शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय वाढवून नागरिकांना तातडीने न्याय मिळावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल.

## डोंबिवली हल्ल्याच्या निषेधार्थ २० जुलैला लातूरमध्येही आरोग्य सेवा बंद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जुलै : डोंबिवली येथील शास्त्रीनगर महापालिका रुग्णालयात डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्रच्या हाकेला प्रतिसाद देत आयएमए लातूर शाखेतर्फे २० जुलै रोजी सकाळी ६ ते २१ जुलै रोजी सकाळी ६ या कालावधीत २४ तासांचे आंदोलन करण्यात येणार असून यात सर्व पॅथीचे डॉक्टर्स तसेच पॅरामडीकल तसेच आरोग्य सेवेशी सर्व कर्मचारी सहभागी होणार असल्याची माहिती आयएमए लातूर शाखेचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत आणि सचिव डॉ. विश्रांत भारती यांनी दिली.

या आंदोलनादरम्यान लातूर शहर व जिल्ह्यातील आयएमएशी संलग्न डॉक्टरांकडून नियमित बाह्यरुग्ण विभाग, नियोजित शस्त्रक्रिया आणि नियमित वैद्यकीय सेवा बंद ठेवण्यात येणार आहेत. मात्र आपत्कालीन सेवा सुरू राहणार आहेत. डॉ. हर्षवर्धन राऊत यांनी डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांवरील वाढत्या हिंसाचारामुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. आरोग्यसेवेवरील हिंसाचाराविरोधात शून्य सहनशीलता धोरणाची कठोर अंमलबजावणी करावी तसेच देशभर लागू होईल असा आरोग्य कर्मचाऱ्यांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र केंद्रीय कायदा तातडीने करावा, अशी मागणी आयएमएने केली असल्याचे सांगितले. सचिव डॉ. विश्रांत भारती यांनी हल्लेखोरांवर कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाशिवाय कठोर कारवाई करण्यात यावी. महाराष्ट्र मेडिकेअर सेवा व्यक्ती व संस्था अधिनियम अधिक प्रभावी करून डॉक्टरांवरील गंभीर हल्ले दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हे घोषित करावेत. अशा प्रकरणांचा तपास निश्र्चित कालमर्यादेत पूर्ण करून जलदगती न्यायालयात खटले चालवावेत, अशी मागणी असल्याचे सांगितले. सर्व शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये कायमस्वरूपी सुरक्षा व्यवस्था, प्रवेश नियंत्रण, सीसीटीव्ही यंत्रणा, प्रशिक्षित सुरक्षा रक्षक आणि पोलिस समन्वय व्यवस्था अनिवार्य करण्यात यावी. अशी मागणीही करण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्यातील सर्व डॉक्टर, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी आणि आरोग्य क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांनी या आंदोलनात सहभागी होण्याचे तसेच नागरिकांनी या आंदोलनाला सहकार्य करावे आणि अत्यावश्यक नसलेल्या उपचारांसाठी २० जुलै रोजी रुग्णालयात येणे टाळावे, असे आवाहन लातूर आयएमएने केले आहे.आयएमएच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न

घेतल्यास १ ऑगस्टपासून राज्यभर बेमुदत आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही आयएमए महाराष्ट्रने दिला आहे.

## मुरूड येथील आठवडी बाजाराच्या जागेवर अतिक्रमण
### पंचायत समितीला दिले निवेदन अतिक्रमण हटविण्याची ग्रामस्थांची मागणी

तभा वृत्तसेवा

मुरुड दि. १७ जुलै : मुरुड येथील ग्रामपंचायतीच्या मालकीच्या आठवडी बाजाराच्या जागेवर कथित अतिक्रमण करून स्मशानभूमीचा विस्तार करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोप करीत संतप्त ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी, पंचायत समितीकडे निवेदन सादर केले आहे. या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून अतिक्रमण हटविण्यात यावे, अन्यथा गावातील सामाजिक सलोखा व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

१३ जुलै २०२६ रोजी सादर करण्यात आलेल्या निवेदनात ग्रामस्थांनी नमूद केले आहे की, मुस्लिम समाजासाठी अंत्यविधी व दफनविधीसाठी गावात आधीपासूनच दोन स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध असून त्या ठिकाणी पुरेशी जागा शिल्लक आहे. असे असतानाही ग्रामपंचायतीच्या मालकीच्या बाजार मैदानावर स्मशानभूमीच्या नावाखाली अतिक्रमण करून संरक्षक कंपाऊंड उभारण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित जागा

ही अनेक वर्षांपासून मुरुडच्या आठवडी बाजारासाठी वापरली जाते. या बाजारातून शेतकरी, व्यापारी, भाजी विक्रेते, लघु व्यावसायिक आणि सर्वसामान्य नागरिकांचा उदरनिर्वाह चालतो. बाजाराची जागा कमी झाल्यास व्यापारावर परिणाम होऊन आर्थिक फटका बसण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात काही व्यक्ती राजकीय व आर्थिक स्वार्थातून बाजाराच्या सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप करण्यात आला असून, प्रशासनाने याची सखोल चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय हा विषय अत्यंत संवेदनशील असल्याने कोणत्याही प्रकारचा सामाजिक तणाव निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून बाजार मैदानावरील कथित अतिक्रमण रोखावे आणि सार्वजनिक जागेचे संरक्षण करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच सहाय्यक पोलिस निरीक्षक, मुरुड पोलिस ठाणे यांनाही पाठविण्यात आल्या असून,

या प्रकरणात प्रशासन काय भूमिका घेते याकडे मुरुडकरांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने नागरिकांच्या निवेदनाची गंभीर दखल घेऊन आठवडी बाजारातील सर्वच बेकायदेशीर अतिक्रमणे तात्काळ हटवावीत. सार्वजनिक जागेचे संरक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. याकडे दुर्लक्ष झाल्यास नागरिकांच्या सहभागातून येणाऱ्या काळात तीव्र लढा उभारण्यात येईल, असा इशारा विनोद कणसे, सामाजिक कार्यकर्ते यांनी दिला आहे.

### दिव्यांग राष्ट्रीय पुरस्कारासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १७ जुलै : भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या दिव्यांगजन सक्षमीकरण विभागाच्या वतीने दिले जाणारे 'दिव्यांग सशक्तीकरण राष्ट्रीय पुरस्कार-२०२६' जाहीर करण्यात आले असून या राष्ट्रीय पुरस्कारांतर्गत प्रामुख्याने 'सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन', 'श्रेष्ठ दिव्यांगजन' आणि 'श्रेष्ठ सृजनशील दिव्यांग बाल/बालिका' या तीन श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याने लातूर जिल्ह्यातील पात्र दिव्यांग व्यक्ती, संस्था, स्वयंसेवी संस्था, नियोक्ते आणि कर्मचाऱ्यांनी आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने विहित नमुन्यात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह सादर करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

## लातूरमध्ये २१ जुलै रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

लातूर, दि. १७ जुलै : केंद्र शासनाच्या नॅशनल करिअर सर्व्हिस प्रकल्पाच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, २१ जुलै, २०२६ रोजी सकाळी १० वाजता औसा रोडवरील जिल्हा क्रीडा संकुल परिसरात असलेल्या शासकीय तंत्र प्रशाला केंद्रात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात अनेक नामांकित आस्थापना आणि खाजगी क्षेत्रातील उद्योजक सहभागी होऊन उमेदवारांच्या थेट मुलाखती घेणार असून यामध्ये दहावी, बारावी उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण, कोणत्याही शाखेचे पदवीधर व पदव्युत्तर पदवीधारक, तसेच आय.टी.आय. आणि डिप्लोमा उत्तीर्ण अशा विविध शैक्षणिक पात्रता असणाऱ्या उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या संधीचा लाभ घेण्यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींनी आणि नोकरी इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी येताना आपली सर्व मूळ शैक्षणिक कागदपत्रे, स्वतःचा अद्ययावत रिझ्युम किंवा बायोडाटा आणि पासपोर्ट आकाराचे फोटो यांच्या प्रत्येकी तीन प्रतींसह निश्र्चित केलेल्या वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे. तसेच या रोजगार मेळाव्याच्या आयोजनाबाबत उमेदवारांना काही अडचण किंवा शंका असल्यास अधिक माहितीसाठी कार्यालयातील प्रतिनिधी दत्तात्रय कांबळे (भ्रमणध्वनी क्र. ९०२८२३८४६५), लहू भंडारे (भ्रमणध्वनी क्र. ८०५५९९२९००) अथवा प्रवीण वाघमारे (भ्रमणध्वनी क्र. ९९२२९२५८९५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कारखाना मालकीचे ऊस तोडणी यंत्र भाड्याने चालविण्यास घेण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जुलै : तालुक्यातील मळवटी येथील ट्वेंन्टीवन शुगर्स या कारखान्याने गाळप हंगाम २०२६-२७ साठी कारखाना मालकीचे ऊस तोडणी यंत्र (हार्वेस्टर) भाड्याने चालविण्यास देण्याबाबत निर्णय घेतलेला असुन ऊस तोडणी यंत्र ट्वेंन्टीवन शुगर्स लि. कडे भाडयाने चालविण्यास घेण्यासाठी अर्ज करण्याचे जाहीर आवाहन केले आहे. या निर्णयामुळे स्थानिक ऊस उत्पादक शेतकरी व ऊस तोडणीचा अनुभव असलेल्या कंत्राटदारांना रोजगाराची व व्यवसाय वृद्धीची संधी उपलब्ध होणार आहे.

कारखान्याच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, कारखान्याच्या मालकीचे न्यु हॉलंड-४०१० व शक्तीमान कंपनीचे आधुनिक ऊस तोडणी यंत्र (हार्वेस्टर) इच्छुकांना केले आहे.

भाड्याने देण्यात येणार आहेत. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे ऊस तोडणी प्रक्रियेत यांत्रिकीकरणाला चालना देणे आणि शेतकरी व तोडणी वाहतूक कंत्राटदार यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे हा आहे. विशेषतः सध्या ऊस तोडणी मजुरांच्या कमतरतेमुळे ऊस तोडणीमध्ये येणाऱ्या अडचणी लक्षात घेता. हार्वेस्टरच्या वापरामुळे या समस्येवर मोठ्या प्रमाणात पर्याय उपलब्ध होणार असल्याचे कारखाना प्रशासनाने नमूद कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी व ऊस तोडणीचा अनुभव असलेले कंत्राटदार यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुकांनी विहित नमुन्यातील अर्ज कारखाना कार्यस्थळावरील शेतकी कार्यालयात दि. २० जुलै २०२६ पुर्वी सादर करणे आवश्यक आहे. गाळप हंगाम २०२६-२७ साठी हार्वेस्टर भाड्याने देण्याचा निर्णय हा शेतकरी व कंत्राटदार यांना लाभदायक ठरणार असून, ऊस तोडणी प्रक्रियेला गती देण्यास महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कारखान्याच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहीतीसाठी जोगदंड ९६२३०११६१६, साळुंके ९७०२५०००५५ यांच्याशी करावा.

## 'शाहू'च्या विद्यार्थांनी घेतली अंमली पदार्थ विरोधी शपथ



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जुलै : येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना व अंमलीपदार्थ विरोधी टास्कफोर्स, नांदेड विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाविद्यालयात अमलीपदार्थ विरोधी विशेष कार्यक्रमाच आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात प्रास्ताविक मनोगत व्यक्त करताना कार्यक्रमधिकारी डॉ. कल्याण सावंत यांनी डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी पाहिलेले मिशन २०-२० चे विकसित भारताचे स्वप्न पुर्ण ना होण्यास जवाबदार आजचा व्यसनेच्या आहारी गेलेला तरुण आहे असे सांगितले. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स नांदेड विभागचे प्रमुख पोलीस निरीक्षक दिगंबर कोपरे, हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. सुदर्शन पाटील होते. सूत्रसंचलन प्रा. माधव शेळके यांनी केले, तर आभार डॉ. प्रकाश रोडिया यांनी मानले. या कार्यक्रमास अंमलदार राजेश्र्वर कांदे, गणेश जाधव, प्रा. विजय गवळी, डॉ. राहुल मोरे, प्रा. जयश्री जटाळ, प्रा. चंद्रप्रभा कुलकर्णी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार शिवकांता बालाजी पतंगे, रा. रुई, ता.जि.लातूर यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना मुन्नी पैगंबर सय्यद, रा. येळवट, ता. औसा जि.लातूर यांनी खरेदीखत दस्त क्रं. लतर-१/४६९६/२०२५, दि.०८/०५/२०२५ ईसवी अन्वये खरेदी मालकी व कब्जेवहिवाटीचा प्लॉट मीजे. हरंगुळ (बु.), ता.जि.लातूर येथील जमीन गट नंबर ७४ पैकीचा अकृषी झालेला अकृषी क्रं. २०२३/जेएमबी -१/डेस्क -१/लातूर/सीआर ११, दि.१०/०२/२०२३ ईसवी अन्वये मे. कलेक्टर ऑफीस, लातूर यांनी मंजूर केलेला याचा लेआऊट नंबर एनए/हरंगुळ बु./ गट नं. ७४/तालुका आणि जिल्हा लातूर /एसएसएनआरएल - ११६, दि.१२/०१/२०२३ ईसवी अन्वये मे. सहाय्यक नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेला खाजगी प्लॉट नंबर ६५ पुर्ण असून याची लांबी पुर्व पश्र्चिम १२.१९ मी. व रूंदी दक्षिण उत्तर ७.२५ मी. असून याचे एकूण क्षेत्रफळ ८८.३७ चौ.मी. (९५०.८६ ची. फुट) आहे.

याची चतुः सीमा चतुःसीमा खालील प्रमाणे :- पुर्वेस प्लॉट नंबर ६८, पश्र्चिमेस ९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस प्लॉट नंबर ६४, उत्तरेस :- प्लॉट नंबर ६६. येणे प्रमाणे वरील चतुःसीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडुन तोंडी करार करुन घेऊण, इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्क संबंध, कर्ज बोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवाया मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक १७/०७/२०२६

तर्फे
ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक, लातूर
मो नं.९४२१९ ८६४९५

जाहीर प्रगटन देणार
शिवकांता बालाजी पतंगे,
रा. रुई, ता.जि.लातूर
मो नं.७५१७८१०८१४

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ थांबवा : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची मागणी : महावितरणला निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** स्मार्ट मीटरच्या सक्तीच्या अंमलबजावणीविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने गुरुवारी परभणी येथील महावितरण कार्यालयात अधीक्षक अभियंत्यांना निवेदन सादर करण्यात आले. राज्यभरात स्मार्ट मीटरबाबत नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम आणि शंका निर्माण झालेल्या असताना हा निर्णय जनतेवर सक्तीने लादू नये, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

स्मार्ट मीटरच्या अंमलबजावणीबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असून वीज ग्राहकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा विचार करून स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ थांबवावी आणि नागरिकांच्या शंका-समाधानासाठी व्यापक जनजागृती करण्यात यावी. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी जनहिताच्या विरोधातील कोणत्याही निर्णयाला पक्षाकडून ठाम विरोध करण्यात येईल, अशी भूमिका मांडली. सामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पक्ष रस्त्यावर उतरून संघर्ष करण्यास सदैव तत्पर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी माजी खासदार डॉ. फौजिया खान, माजी आमदार सुनील भुसारा, माजी आमदार विजय गव्हाणे, प्रदेश उपाध्यक्ष भीमराव हत्तीआंबिरे, पंकज बोराडे, जिल्हा कार्याध्यक्ष संतोष बोबडे, परभणी निरीक्षक तथा माजी आमदार संजय वाघचौरे, जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे, दिव्यांग जिल्हाध्यक्ष सय्यद युनूस भैया यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि वीज ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्रेया परीक्षेत बाल विद्या विहारच्या ३१ विद्यार्थ्यांचे घवघवीत यश : ७ विद्यार्थ्यांना ट्रॉफी, तर २४ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक; गुणवंतांचा गौरव

**परभणी,/प्रतिनिधी :** नुकताच जाहीर झालेल्या श्रेया इंटेलिजंट अकॅडमी सर्च परीक्षेच्या निकालात बाल विद्या विहारच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत प्रशालेच्या एकूण ३१ विद्यार्थ्यांनी यश मिळविले असून त्यापैकी ७ विद्यार्थ्यांना ट्रॉफी व सन्मानचिन्ह, तर २४ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार प्रशालेचे मुख्याध्यापक नितीन गोरडकर यांच्या हस्ते करण्यात आला.

इयत्ता पहिली ते चौथीमधील १८ विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले. ट्रॉफी व प्रमाणपत्र मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता चौथी (इंग्रजी माध्यम) मधील श्लोक निलेश टिवटनकर, इयत्ता पहिलीतील प्रज्वल मयूर टाक, इयत्ता सहावीतील सई भागवत खराबे तसेच इयत्ता सातवीतील श्रेया स्वदेश कदम, अनन्या महेश कुन्हे आणि चैतन्य दत्ता खंदारे यांचा समावेश आहे.

सुवर्णपदक विजेत्यांमध्ये इयत्ता पहिलीतील कैवल्य ज्ञानदेव पातळे, इयत्ता दुसरीतील देविका रामदास कदम, रुद्र विष्णू शेळके आणि शिवांश राजेश्वर जुकटे, इयत्ता तिसरीतील स्वानंदी गिरीश दैठणकर, कृतिका दिनेश जाधव, निकुंज गोपाल भुतडा, दुर्गा अमोलराव देशमुख आणि ध्रुव धनंजय शिंदे यांचा समावेश आहे. इयत्ता चौथीमधील अथर्व प्रसाद कानडखेडकर, रणविजय रत्नेश्वर भिसे, राजवीर शंकरराव गायकवाड, स्वराज सुजितसिंग सूर्यवंशी, शौर्य अजय कांबळे, शेषराव अर्पण देवडे आणि रणवीर अमोल जाधव यांनीही सुवर्णपदक प्राप्त केले.

तसेच इयत्ता पाचवीतील पार्थ पांडुरंग टेकाळे, इयत्ता सहावीतील श्रावणी किरण मोरे, पुष्कर शिरीष बोरोले, शुभ्रा शिवाजी भोंडवे, सई भागवत खराबे आणि ज्ञानेश राम खरबे, तर इयत्ता सातवीतील अधिराज अभय देशमुख, सिद्धी विनोद रसाळ आणि राधिका शरद पवार यांनी सुवर्णपदकासह प्रमाणपत्र प्राप्त केले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना भाग्यश्री शेटे, स्वाती कुलकर्णी, प्राजक्ता कानडखेडकर, विशाखा दैठणकर, सुनिता दैठणकर, सारिका डहाळे, स्मिता उपाध्ये, सुजाता शेवाळे, आदित्य शिंदे, आनंद बदाले, केशव पराड, नझीर शेख, दत्ता देवकर आणि नागेश जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थाध्यक्ष डॉ. नंदकुमार झरकर, उपाध्यक्ष ड. विलास पोहंडूळकर, सचिव डॉ. विवेक नावंदर, सहसचिव ड. संजय देशपांडे, कोषाध्यक्ष विनय नावंदर, सदस्य ड. अशोक सोनी, पवनकुमार झांजरी, मल्हार विहीटकर, सदस्या डॉ. अनिता विवेक नावंदर, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचे अभिनंदन केले.

# राष्ट्रवादी काँग्रेसची संघटनबांधणी मजबूत करणार : शिंदे

## प्रत्येक गाव, प्रत्येक बूथवर पक्ष बळकट करण्याचा निर्धार; नव्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण

**परभणी ,/प्रतिनिधी:-** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आगामी काळात अधिक सक्षम आणि जनाधार असलेली संघटना उभी करण्यासाठी राज्यभरात संघटन विस्तारावर भर देणार असून, नव्या कार्यकर्त्यांना संधी देत प्रत्येक गाव आणि प्रत्येक बूथपर्यंत पक्षाची ताकद पोहचविण्यात येणार आहे, असे प्रतिपादन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केले.

वसमत रस्त्यावरील राष्ट्रवादी भवनात आज गुरुवार १६ जूलै रोजी आयोजित पक्षाच्या पदनियुक्ती व संघटन विस्तार बैठकीत ते बोलत होते. यावेळी माजी खासदार डॉ. फौजिया खान, माजी आमदार सुनील भुसारा, माजी आमदार विजय गव्हाणे, प्रदेश उपाध्यक्ष भीमराव हत्तीआंबिरे, पंकज बोराडे, जिल्हा कार्याध्यक्ष संतोष बोबडे, परभणी निरीक्षक तथा माजी आमदार संजय वाघचौरे, जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलतांना शशिकांत शिंदे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष हा सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारा पक्ष आहे. आगामी काळात जनतेच्या प्रश्नांवर अधिक आक्रमक भूमिका घेतली जाईल. प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाची खरी ताकद असून, बूथस्तरापासून संघटना मजबूत करण्यासाठी व्यापक अभियान राबविले जाणार आहे. परभणी जिल्हा हा शरद पवार यांच्यावर प्रेम करणारा जिल्हा असून, पूर्वीप्रमाणेच पुन्हा एकदा येथे पक्षाचे मजबूत संघटन उभारण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



या कार्यक्रमास अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष रहेमान खान पठाण, महिला सरचिटणीस सोनाली देशमुख, महासचिव जावेद अहमद खान, शहराध्यक्ष अब्दुल माजिद, अब्दुल रशीद, सामाजिक न्याय विभागाचे उपाध्यक्ष डॉ. दशरथ तुपसुंदर, युवक प्रदेश सचिव देवानंद हत्तीआंबिरे, शहर जिल्हाध्यक्ष सुशील कांबळे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज जोगदंड, जिल्हा सरचिटणीस गंगाप्रसाद यादव, दिव्यांग जिल्हाध्यक्ष सय्यद युनूस भैय्या, शहर सचिव अल्ताफ शेख, जिंतूर तालुकाध्यक्ष मनोज थिट्टे, सोनपेठ तालुकाध्यक्ष अशोकराव ताथावडे, पाथरी तालुका कार्याध्यक्ष नामदेव ढवळे यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती..

यावेळी पक्ष संघटन विस्ताराच्या अनुषंगाने विक्रम काळे यांची जिल्हा सरचिटणीस, वसंत शिंदे आणि गंगाप्रसाद यादव यांची जिल्हा चिटणीस, ॲड. अभिजित देशमुख यांची विधी सेल जिल्हाध्यक्ष तसेच नामदेव चापके यांची परभणी महानगर शिक्षक सेल अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमात संबंधित पदाधिकाऱ्यांना पदनियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच अल्पसंख्याक विभागातील परभणी शहरातील नव्या पदाधिकाऱ्यांचा पक्षप्रवेशही पार पडला. नव्याने पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करून त्यांनाही पदनियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

प्रत्येक बूथवर पक्ष मजबूत करणार... प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना पक्षाची ताकद बूथस्तरावर वाढविण्यावर विशेष भर दिला. प्रत्येक गाव, प्रत्येक बूथ आणि प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा आधारस्तंभ असल्याचे सांगत आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटन अधिक सक्षम करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले.

## परभणी रेल्वे स्थानकावर अल्पवयीन मुलाची सुटका

**परभणी,/प्रतिनिधी-** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे सुरक्षा बलाने (आरपीएफ) 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत १४ जुलै रोजी परभणी रेल्वे स्थानकावर एका अल्पवयीन मुलाची सुरक्षित सुटका करून बालसंरक्षणाबाबतची आपली संवेदनशीलता आणि तत्परता पुन्हा एकदा सिद्ध केली.

मिळालेल्या माहितीनुसार, १४ जुलै रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास परभणी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर नियमित गस्त घालत असताना सहाय्यक उपनिरीक्षक भीमराव जोगदंड आणि सहाय्यक उपनिरीक्षक बी. व्ही. नलाबळे यांना एक अल्पवयीन मुलगा संशयास्पदरीत्या एकटाच फिरताना आढळून आला. त्यानंतर त्यांनी मुलाशी संवाद साधत प्राथमिक चौकशी केली व पुढील पडताळणीसाठी त्याला रेल्वे सुरक्षा बलाच्या परभणी पोस्टवर आणले. चौकशीदरम्यान संबंधित मुलाने आपले नाव आकाश (वय १६ वर्षे) असून तो तेलंगणा राज्यातील निजामाबाद येथील रहिवासी असल्याची माहिती दिली. तसेच कोणालाही न सांगता घरातून बाहेर पडल्याचेही त्याने सांगितले.

मुलगा अल्पवयीन आहे.

### 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत रेल्वे सुरक्षा बलाची तत्पर कारवाई; बाल कल्याण समितीकडे सुपूर्द

असल्याचे लक्षात येताच आरपीएफने तत्काळ चाईल्ड हेल्पलाईन, परभणी यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर चाईल्ड हेल्पलाईनचे प्रतिनिधी यशवंत सोनकांबळे यांच्या उपस्थितीत मुलास बाल कल्याण समिती, परभणी यांच्यासमोर हजर करण्यात आले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर संबंधित अल्पवयीन मुलाला त्याच्या सुरक्षिततेसाठी आणि पुढील संरक्षणात्मक कार्यवाहीसाठी योग्य पावतीसह बाल कल्याण समितीच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले.

रेल्वे परिसरात आढळणाऱ्या हरवलेल्या, बेवारस किंवा असुरक्षित परिस्थितीतील मुलांचे संरक्षण व पुनर्वसन करण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेचे रेल्वे सुरक्षा बल 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत सातत्याने कार्यरत असून, बालसुरक्षेबाबतची आपली बांधिलकी कायम ठेवत असल्याचे यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेत प्रगती कमी; १६ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व १६ बीएलओंना कारणे दाखवा नोटिसा

**परभणी,/प्रतिनिधी-** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार परभणी जिल्ह्यात विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रम युद्धपातळीवर राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक मतदान केंद्रावरील गणना फॉर्म निर्धारित कालावधीत शंभर टक्के भरून घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून सातत्याने आढावा घेतला जात आहे. या आढाव्यात काही सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (एईआरओ) तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या कार्यक्षेत्रातील कामाची प्रगती अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील गंगाखेड, जिंतूर, परभणी आणि पाथरी विधानसभा मतदारसंघातील प्रत्येकी चार अशा एकूण १६ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. यामध्ये गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील बि. टी. बहिराम, संयजकुमार देशपांडे, शोयब खान आणि किरण सुरडवाड, जिंतूर विधानसभा मतदारसंघातील बी. एस. नांदापूरकर, उमेश ढाकणे, के. बी. जाधव आणि शितल कच्छवे, परभणी विधानसभा मतदारसंघातील डी. पी. कुपटेकर, तुकाराम कदम, गजानन जाधव आणि आवेज हाश्मी तसेच पाथरी विधानसभा मतदारसंघातील शौकत मुबारक पठाण, गोविंद कोल्हे, रमेश धोपे आणि अजित सुरवसे यांचा समावेश आहे.

याशिवाय कामातील अपुरी प्रगती लक्षात घेऊन १६ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनाही कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या आहेत. परभणी विधानसभा मतदारसंघातील कुंडलिक चोखोबा मुजमुले (भाग क्र. २३३), कांबळे जे. डी. (भाग क्र. १२४), सोमनाथ बोरामने (भाग क्र. २१८) आणि एन. बी. सोनटक्के (भाग क्र. १९०), जिंतूर विधानसभा मतदारसंघातील अब्दुल गफार जब्बार शेख (भाग क्र. ३०६), नागिले शंकर अण्णाराव (भाग क्र. ७६), एच. एस. खिरे (भाग क्र. ४२१) आणि भूरके के. पी. (भाग क्र. ३८), गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील श्रीरामे बालाजी तुकाराम (भाग क्र. ३९५), नागार्जन लक्ष्मणराव कनसे (भाग क्र. २२५), रामेश्वर सोपानराव भोसले (भाग क्र. ३४७) आणि समाधान बाबाराव गडदे (भाग क्र. ६१) तसेच पाथरी विधानसभा मतदारसंघातील एन. टी. वाघ (भाग क्र. १८८), गौरव जाधव (भाग क्र. ३०३), पवार दत्ता केशव (भाग क्र. ३६३) आणि नदीम अहमद रहीम खान (भाग क्र. ३६१) यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपला खुलासा सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी सर्व संबंधितांना एसआयआर कार्यक्रमास सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत. प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचून गणना फॉर्म शंभर टक्के भरून घेणे, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे आणि निर्धारित मुदतीत सर्व कामे पूर्ण करणे याबाबत काटेकोर कार्यवाही करण्यास सांगण्यात आले आहे.

एसआयआर अभियानास सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश....

जिल्हा प्रशासनाकडून एसआयआर अभियानाचा दैनंदिन आढावा घेतला जात असून, कामात हलगर्जीपणा किंवा विनाकारण विलंब आढळल्यास भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तसेच संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी निर्धारित वेळेत, अचूक आणि शंभर टक्के काम पूर्ण करून मतदार यादी अद्ययावत करण्याच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमात सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केले

# मनपा समाज कल्याण समितीच्या बैठकीत विकासकामांच्या प्रस्तावांना मंजुरी

## टक्के राखीव निधीतून समाजमंदिरे, रस्ते, नाल्या, ज्येष्ठ नागरिक केंद्र व विद्यार्थी वसतिगृहासाठी महत्त्वाचे निर्णय

**परभण ,/प्रतिनिधी-:** महानगरपालिकेच्या गलिच्छवस्ती निर्मूलन व समाज कल्याण समितीच्या बैठकीत समाज कल्याण विभागासाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीतून विविध विकासकामांच्या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करून अनेक महत्त्वपूर्ण कामांना मंजुरी देण्यात आली.

समाजकल्याण समितीचे सभापती राजेश शंकरराव रणखांबे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. १६) महानगरपालिका सभापती दालनात बैठक पार पडली. बैठकीस उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे, नगरसचिव विकास रत्नपारखे, मुख्य लेखा अधिकारी डॉ. प्रकाश दासे, सहाय्यक आयुक्त गजानन जाधव, लेखा अधिकारी अमोल सोळंके, समाज कल्याण अधिकारी राजकुमार जाधव यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विविध प्रभागांतील पायाभूत सुविधा, समाजमंदिरांची देखभाल, रस्ते, नाल्या, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र तसेच विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारणी यासंदर्भातील प्रस्तावांवर बैठकीत चर्चा करण्यात आली.

बैठकीच्या प्रारंभी प्रभाग क्रमांक ६ मधील रघूदाम सोसायटी येथे क्लब हाऊसचे बांधकाम व दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव नगरसेवक आकाश लहाने व मिलिंद बामणीकर यांनी मांडला. स्थानिक नागरिकांसाठी सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक उपक्रमांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने मांडण्यात आलेल्या या प्रस्तावास समितीने मंजुरी दिली. प्रभाग क्रमांक १२ मध्ये सार्वजनिक शौचालय व उद्यान विकसित करण्याचा प्रस्ताव नगरसेवक बबलू घागरमाळे यांनी मांडला. नगरसेविका उषा अवचार यांनी या प्रस्तावास अनुमोदन दिले. नागरिकांच्या सोयीसाठी हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत अंतिम मंजुरीसाठी पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. महानुभाव मठ परिसरात नाली बांधकाम करण्याचा प्रस्ताव चर्चेस आला असता, आवश्यक कागदपत्रे व तांत्रिक बाबी अपूर्ण असल्याने हा प्रस्ताव सभागृहाने सर्वानुमते नामंजूर केला.

शहरातील विविध समाजमंदिरांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यक दुरुस्ती, रंगरंगोटी आणि साहित्य उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव नगरसेविका निर्मला वाघमारे तसेच नगरसेवक आकाश लहाने आणि मिलिंद घागरमाळे यांनी मांडला. समाजमंदिरे ही सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची केंद्रे असल्याने त्यांची सुरक्षितता आणि सुविधा वाढविणे आवश्यक असल्याचे मत सदस्यांनी व्यक्त केले. हा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला.

उपमहापौर गणेश देशमुख यांच्या पत्रानुसार प्रभाग क्रमांक १ मधील त्रिमूर्ती नगर येथील श्री साईबाबा मंदिर सभागृहात ज्येष्ठ नागरिकांसाठी करमणूक व विरंगुळा केंद्र सुरू करण्यासाठी हॉलची दुरुस्ती व अनुषंगिक कामे करण्याचा प्रस्तावही मंजूर करण्यात आला. नगरसेविका बेगम मोहसीन खान यांनी या प्रस्तावास मान्यता देण्याची मागणी केली, तर मिलिंद घागरमाळे यांनी अनुमोदन दिले. ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक संवाद, वाचन आणि मनोरंजनासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला. महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाल्यांचा सत्कार करण्याच्या प्रस्तावालाही समितीने मंजुरी दिली. गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

बैठकीत प्रभाग क्रमांक १६ मधील अशोक आलने यांच्या घरापासून शेख नूर यांच्या घरापर्यंत रस्ता बांधकाम व मजबुतीकरणाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच प्रभाग क्रमांक १३ मधील रमाबाई आंबेडकर नगर येथील समाजमंदिराची देखभाल व दुरुस्ती करण्याचाही निर्णय घेण्यात आला. प्रभाग क्रमांक १५ मधील पवनपुत्र कॉलनी, खानापूर परिसरात विविध ठिकाणी नाली बांधकाम करण्याच्या प्रस्तावालाही सभागृहाने एकमताने मंजुरी दिली. या कामामुळे परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा सुलभ होऊन नागरिकांना दिलासा मिळणार आहे. याशिवाय प्रभाग क्रमांक ३ मधील भैय्यासाहेब आंबेडकर नगर समाजमंदिर परिसराचे सुशोभीकरण व गटार बांधकाम करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

बैठकीत ऐनवेळी आलेल्या विषयावर मुला-मुलींसाठी स्वतंत्र नवीन वसतिगृह उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून शासनाकडे बांधकामाचा प्रस्ताव पाठविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सुसज्ज निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव पुढे पाठविण्यात येणार आहे.

बैठकीच्या शेवटी मुख्य लेखा अधिकारी डॉ. प्रकाश दासे आणि लेखा अधिकारी अमोल सोळंके यांनी समाज कल्याण विभागासाठी उपलब्ध निधी, त्याचे नियोजन आणि खर्चाबाबत माहिती दिली. समाज कल्याण अधिकारी राजकुमार जाधव यांनी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा सादर केला. त्यानंतर मंजूर झालेल्या सर्व विषयांवर पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यास समितीने मान्यता दिली.

समाजमंदिरे व ज्येष्ठ नागरिक केंद्रासाठी महत्त्वाचे निर्णय...

समाज कल्याण समितीच्या बैठकीत शहरातील विविध समाजमंदिरांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यक दुरुस्ती, रंगरंगोटी व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. तसेच प्रभाग क्रमांक १ मधील त्रिमूर्ती नगर येथे श्री साईबाबा मंदिराच्या सभागृहात ज्येष्ठ नागरिकांसाठी करमणूक व विरंगुळा केंद्र सुरू करण्यासाठी हॉल दुरुस्ती व अनुषंगिक कामांना हिरवा कंदील देण्यात आला. या निर्णयामुळे ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक उपक्रमांसाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारण्याचा प्रस्ताव...

बैठकीतील सर्वात महत्त्वाच्या निर्णयांपैकी एक म्हणजे मुला-मुलींसाठी स्वतंत्र नवीन वसतिगृह उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून शासनाकडे बांधकामाचा प्रस्ताव पाठविण्याचा निर्णय. परभणी शहरात शिक्षणासाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असून त्यांना सुरक्षित व सुसज्ज निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा प्रस्ताव पुढे पाठविण्यात येणार आहे. समाज कल्याण समितीच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या निवासाच्या प्रश्नाला दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# दिवस 'कृती'चे...

राज्यातील महायुती सरकारने विधिमंडळ अधिवेशनात केलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबद्दल भाजपाच्या किसान मोर्चाने बुधवारी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार आयोजित करून कृतज्ञता व्यक्त केली. राजकीय पक्ष म्हणून भाजपाने या निर्णयाचा गाजावाजा करण्यात काहीच गैर नाही. किंबहुना, या सोहळ्यामुळेच महाराष्ट्रातील शेती क्षेत्राच्या शाश्वत विकासाचा एक व्यापक आराखडा मुख्यमंत्र्यांच्या भाषणातून महाराष्ट्रासमोर आला. महाराष्ट्राच्या भावी पिढीला दुष्काळ हा शब्द माहीतदेखील असणार नाही अशा विकासाची अनेक कामे हाती घेतल्याची ग्वाही देऊन मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या संकल्पांचे वेगवेगळे बिंदू जोडले, तर 'सुजलाम् सुफलाम्' महाराष्ट्राचे एक सुंदर रांगोळी चित्र तयार होईल, अशा अपेक्षा मुख्यमंत्र्यांच्या या पैलूदार भाषणामुळे उंचावल्या आहेत. पण शेतीच्या शाश्वत विकासाचे मुख्यमंत्र्यांचे संकल्प चित्र काही आजचे नाही. मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या टप्प्यातील कारकीर्दीच्या अखेरच्या काळातही त्यांनी हेच चित्र रंगविले होते. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राजकीय उलथापालथ झाली नसती, तर त्यांचे संकल्प सिद्ध झालेले महाराष्ट्रास पाहावयास मिळाले असते, असे आता म्हणता येईल. कारण २०१९ मध्ये महाराष्ट्रात भाजपाची सत्ता गेली तरीही त्यांनी या संकल्पांचा संपूर्ण आराखडा जसाच्या तसा मनात जपून ठेवला होता, हे बुधवारच्या त्यांच्या त्या भाषणातून स्पष्ट दिसते. राज्यातील शेतकऱ्यांच्या गरजा समजावून घेऊन त्यावर काम करण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षांत राज्यातील शेतकऱ्यांसमोर संकटांची आणि समस्यांची मालिका उभी राहिली आहे. शेतकऱ्यास आर्थिक हातभार लागावा यासाठी केंद्र सरकारने फेब्रुवारी २०१९ मध्ये प्रधानमंत्री किसान सन्मान योजना जाहीर केली. या योजनेतून पात्र लाभार्थी शेतकऱ्यास आर्थिक मदतीचा हात केंद्र सरकारने पुढे केला. महाराष्ट्रात याच योजनेत तितक्याच मदतीची भर घालून राज्य सरकारने शेतकऱ्याच्या मदतीचे हात अधिक बळकट केले, तरीही शेतकरी समस्यामुक्त झालाच नाही. त्यामुळे कर्जमाफी किंवा आर्थिक मदत देणे हा शेतकऱ्याच्या कायमच्या समस्यामुक्तीचा मार्ग नाही, हे मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेले वक्तव्य कालातीत सत्य ठरले आहे. समस्यांची ही मालिका अखंडपणे सुरूच असल्याने समस्याग्रस्त शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी केवळ कर्जमुक्ती हा कायमस्वरूपी उपाय नाही, हे स्पष्ट होत असताना आता अनियमित पावसामुळे संकटाचे नवे सावट दाटताना दिसत आहे. राज्यातील ४२ टक्के भागात पावसाचे पाणी विनावापर वाहून वाया जाते आणि ५८ टक्के भाग पाण्यासाठी वणवण करतो, हे मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडलेले वास्तव आणि ही परिस्थिती बदलण्याच्या त्यांच्या संकल्पनेतील उपाययोजना हे या रांगोळीचे महत्त्वाचे बिंदू आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रासमोर उभे केलेले भविष्यातील आनंददायी घडामोडींचे चित्र आश्वासक वाटते. अर्थात, या चित्राला भावनिक किनार आहेच; अशा आनंददायी क्षणांचे साक्षीदार होण्याच्या आनंदात वर्तमानातील समस्यांचा विसर पडून चालणार नाही. असे आनंदाचे क्षण मागे गेले की पुन्हा समस्या डोकी वर काढतात, हा जुना अनुभव आहे. आनंद आणि वेदनांचा अनुभव एकाच वेळी घेता येणे ही मोठी कसरत असते. ती सावधगिरीने पार पाडावी लागते, आणि हीच सावधगिरी मुख्यमंत्र्यांच्या भविष्यचित्रात उमटलेली दिसते. मुख्यमंत्र्यांनी बुधवारी मांडलेली महाराष्ट्राच्या विकासाची रूपरेषा ही केवळ काही योजनांची घोषणा नव्हती. राज्याच्या विकासाच्या पुढील टप्प्याची दिशा दर्शविणारा तो कृती कार्यक्रम होता. कृषी क्षेत्रातील गुंतवणूक हा विकासाच्या कृतीचा केंद्रबिंदू राहील, हा त्यांचा संदेश लक्षवेधी ठरतो. अनेक दशकांपासून महाराष्ट्राच्या विकासाची चर्चा उद्योग, सेवा क्षेत्र, नागरीकरण आणि पायाभूत सुविधांभोवती फिरत होती. आता त्यामध्ये शेती, कृषी प्रक्रिया, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि मूल्यसाखळी या संकल्पना मध्यवर्ती ठिकाणी येत असल्याचे या भाषणातून स्पष्ट झाले. राज्याच्या जवळपास निम्म्याहून अधिक लोकसंख्येचा उदरनिर्वाह आजही शेतीवर अवलंबून आहे. मात्र शेतीतील उत्पन्नातील अस्थिरता, हवामान बदल, पाण्याची टंचाई, बाजारपेठेतील चढ-उतार आणि वाढते उत्पादन खर्च यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर सातत्याने दबाव वाढत आहे. अशा वेळी कृषी क्षेत्राकडे केवळ अनुदान देण्याच्या दृष्टीने नव्हे, तर गुंतवणुकीच्या दृष्टीने पाहण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी अधोरेखित केली. हा दृष्टिकोन दीर्घकालीन परिणाम करणारा ठरू शकतो.

गुंतवणूक म्हणजे केवळ सिंचन प्रकल्प नव्हे. आधुनिक शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन तंत्रज्ञान, अचूक शेती, शीतसाखळी, वेअरहाऊस, अन्नप्रक्रिया उद्योग, निर्यातक्षम उत्पादन, जैविक शेती आणि कृषी संशोधन यांचा एकात्मिक विचार केल्याशिवाय ग्रामीण समृद्धी शक्य होणार नाही. या सर्व घटकांमध्ये नियोजनबद्ध गुंतवणूक केली, तर शेती ही केवळ उपजीविकेचे साधन न राहता ती नफ्याचा उद्योग बनू शकते, हा मुख्यमंत्र्यांचा विश्वास शेतकऱ्यासाठी आश्वासक आहेच, पण या भाषणातून ग्रामीण आणि नागरी विकास यांचा समतोल साधण्याचे एक भानदेखील दिसून येत आहे. आतापर्यंत मोठ्या शहरांमध्ये उद्योग आणि रोजगार केंद्रित झाल्याने ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर झालेल्या स्थलांतरामुळे महानगरांवर लोकसंख्येचा प्रचंड ताण निर्माण होऊन सुविधांची चणचण भासू लागली आहे. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रात कृषी प्रक्रिया उद्योग, ग्रामीण औद्योगिक क्लस्टर आणि स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना मिळाली, तर हा असमतोल कमी होऊ शकतो. ग्रामीण महाराष्ट्राचा शेतीकेंद्रित विकास ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याची संधी या धोरणातून निर्माण होत आहे. उद्योग, सेवा आणि शेती हे तीनही स्तंभ राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी परस्परपूरक आहेत. शेती मजबूत झाली तर ग्रामीण खरेदीशक्ती वाढते. ग्रामीण खरेदीशक्ती वाढली की उद्योगांना मोठी बाजारपेठ मिळते. उद्योग वाढले की रोजगार वाढतो आणि राज्याचा महसूल वाढतो. त्यामुळे कृषी गुंतवणूक ही केवळ शेतकऱ्यांच्या हिताची नसून संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या वृद्धीचा पाया ठरू शकते. त्यामुळे शेतीमधील गुंतवणुकीतून राज्याच्या तिजोरीची ताकद वाढविण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे पूरक प्रयत्न येत्या काळात महाराष्ट्रात पाहावयास मिळतील, अशी अपेक्षा आहे. द्रुतगती मार्ग, बंदरे, विमानतळ, लॉजिस्टिक पार्क, जलसंपदा आणि डिजिटल पायाभूत सुविधा या सर्वांचा शेतीशी थेट संबंध जोडण्याचा मुख्यमंत्र्यांचा प्रयत्न दिसतो. उत्पादनापासून बाजारपेठेपर्यंतचा खर्च कमी झाला, तर शेतकऱ्यांचे उत्पन्न नैसर्गिकरीत्या वाढू शकते. हवामान बदलासारख्या समस्यांच्या पृष्ठभूमीवर शाश्वत शेती विकासाचा महत्त्वाचा घटक ठरणार आहे. पाण्याचा कार्यक्षम वापर, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण, पीक विविधीकरण आणि हवामानस्नेही शेती तंत्रज्ञानाचा प्रसार यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली, तर महाराष्ट्र भविष्यातील कृषी संकटांना अधिक सक्षमपणे तोंड देऊ शकेल. भविष्यात महाराष्ट्राची स्पर्धा इतर राज्यांबरोबरच जागतिक गुंतवणूक, निर्यात आणि तंत्रज्ञानाच्या पातळीवरही असेल. त्यासाठी उद्योगस्नेही वातावरणाबरोबरच कृषिस्नेही राज्याची प्रतिमा निर्माण करणे ही महाराष्ट्राची गरजच आहे. त्यासाठी शेतकरी सक्षम व्हायला हवा. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, ग्रामीण भागात रोजगार निर्माण करणे आणि कृषी मूल्यसाखळी मजबूत करणे या तीन उद्दिष्टांची सांगड घातली, तर महाराष्ट्र देशातील सर्वाधिक संतुलित अर्थव्यवस्था असलेले राज्य बनू शकते. आज महाराष्ट्र एका नव्या वळणावर उभा आहे. या वळणावर घेतलेले निर्णय पुढील पिढ्यांचे आर्थिक भविष्य ठरवतील. त्यामुळे कृषी क्षेत्रातील गुंतवणूक ही राज्याच्या सर्वांगीण विकासाची नवी विचारधारा ठरावी आणि मुख्यमंत्र्यांच्या संकल्पातील कृतीचे दिवस तातडीने सुरू व्हावेत, हीच महाराष्ट्राची अपेक्षा आहे. ■

## अर्थविशेष

# वरिष्ठ नागरिक आणि नवीन करप्रणाली

**ॲड. हितेश पारसे**

भारतातील करव्यवस्था दिवसेंदिवस अधिक पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित होत आहे. आयकर विभागाकडून वार्षिक माहिती विवरणपत्र, करदात्याची माहिती सारांश, ऑनलाईन पडताळणी आणि डिजिटल व्यवहारांच्या माध्यमातून करदात्यांच्या आर्थिक व्यवहारांवर अधिक प्रभावी देखरेख ठेवली जात आहे. अशा परिस्थितीत, विशेषतः वरिष्ठ नागरिकांनी आयकर नियमांची योग्य माहिती असणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

सेवानिवृत्तीनंतर बहुतांश नागरिकांचे उत्पन्नाचे स्वरूप बदलते. नियमित पगाराऐवजी पेन्शन, मुदत ठेवींवरील व्याज, ज्येष्ठ नागरिक बचत योजना, पोस्ट ऑफिस बचत योजना, घरभाडे, लाभांश किंवा इतर गुंतवणुकीतून मिळणारे उत्पन्न हे त्यांच्या आर्थिक जीवनाचा मुख्य आधार बनते. त्यामुळे करप्रणालीची योग्य निवड आणि करनियोजन अधिक महत्त्वाचे ठरते.

दरवर्षी आयकर रिटर्न भरण्याच्या कालावधीत वरिष्ठ नागरिकांमध्ये एकच प्रश्न वारंवार विचारला जातो ' ''जुनी करप्रणाली निवडावी की नवीन?'' सोशल मीडियावरील संदेश, अपूर्ण माहिती आणि ऐकीव सल्ल्यांमुळे अनेक गैरसमज निर्माण होतात. परिणामी, अनेक ज्येष्ठ नागरिक अनावश्यक कर भरतात किंवा चुकीच्या माहितीमुळे भविष्यात आयकर विभागाच्या नोटिसांना सामोरे जातात.

करप्रणालीची निवड ही फक्त कराचे दर पाहून केली जाऊ नये. प्रत्येक व्यक्तीचे उत्पन्न, खर्च, गुंतवणूक, आरोग्यविषयक खर्च, गृहकर्ज, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि भविष्यातील आर्थिक नियोजन वेगळे असते. त्यामुळे प्रत्येक करदात्यासाठी एकच करप्रणाली योग्य असेल असे नाही.

**गैरसमज क्रमांक १** – नवीन करप्रणाली प्रत्येक वरिष्ठ नागरिकासाठी फायदेशीर आहे. हा सर्वांत सामान्य गैरसमज आहे. नवीन करप्रणालीमध्ये कराचे दर तुलनेने कमी असले तरी अनेक महत्त्वाच्या करसवलती आणि वजावटी उपलब्ध नसतात. दुसरीकडे, जुनी करप्रणालीमध्ये कायद्यानुसार विविध गुंतवणुकी, आरोग्य विमा, गृहकर्जावरील व्याज, दान आणि इतर खर्चांवर वजावट मिळू शकते. त्यामुळे ज्या वरिष्ठ नागरिकांकडे अशा वजावटींचा लाभ घेण्याची संधी आहे, त्यांच्यासाठी जुनी करप्रणाली अधिक फायदेशीर ठरू शकते. म्हणूनच, कोणतीही करप्रणाली निवडण्यापूर्वी दोन्ही पद्धतींनुसार कराची गणना करूनच अंतिम निर्णय घेणे हितावह ठरते.

**गैरसमज क्रमांक २** – नवीन करप्रणालीमध्ये वरिष्ठ नागरिकांना स्वतंत्र करसवलत आहे. अनेकांना वाटते की वयाच्या आधारावर नवीन करप्रणालीमध्ये वरिष्ठ किंवा अति वरिष्ठ नागरिकांना स्वतंत्र मूलभूत करमुक्त मर्यादा मिळते. प्रत्यक्षात तसे नाही. नवीन करप्रणालीमध्ये सर्व करदात्यांसाठी समान कररचना लागू होते. त्यामुळे केवळ वयाच्या आधारावर नवीन करप्रणाली अधिक फायदेशीर आहे, असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरू शकते.

**गैरसमज क्रमांक ३** – पेन्शनवर आयकर लागत नाही. सेवानिवृत्तीनंतर मिळणारी नियमित पेन्शन ही आयकराच्या दृष्टीने करपात्र उत्पन्न मानली जाते. अनेक ज्येष्ठ नागरिक केवळ पेन्शनवर आयकर लागत नाही असा समज करून घेतात. प्रत्यक्षात पेन्शनबरोबरच एफडीवरील व्याज, घरभाडे, लाभांश, भांडवली नफा किंवा इतर उत्पन्न असल्यास त्यावर कर लागू होऊ शकतो. त्यामुळे एकूण वार्षिक उत्पन्नाचा विचार करूनच कराची गणना केली जाते.

**गैरसमज क्रमांक ४** – बँकेने टी.डी.एस. कापला म्हणजे कराची जबाबदारी संपली. टी.डी.एस. म्हणजे अंतिम कर नव्हे. बँक किंवा इतर संस्था फक्त कायद्यानुसार ठरावीक प्रमाणात कर कपात करतात. प्रत्यक्ष कराची गणना एकूण उत्पन्नाच्या आधारे केली जाते. काही वेळा अतिरिक्त कर भरावा लागू शकतो, तर काही वेळा जास्त टी.डी.एस. कापल्यामुळे करपरतावा मिळू शकतो. त्यामुळे टी.डी.एस. कापला गेला म्हणून आयकर रिटर्न भरण्याची गरज नाही, हा समज चुकीचा आहे.

**गैरसमज क्रमांक ५** – फॉर्म १५एच भरला म्हणजे आयकर भरावा लागत नाही. फॉर्म १५एच हा करमुक्तीचा दस्तावेज नसून फक्त ठरावीक परिस्थितीत टी.डी.एस. टाळण्यासाठी दिले जाणारे घोषणापत्र आहे. जर प्रत्यक्ष उत्पन्न करपात्र असेल, तर फॉर्म १५एच भरला असला तरी आयकर भरण्याची जबाबदारी कायम राहते. अनेक वरिष्ठ नागरिक या दोन्ही बाबींमध्ये गोंधळ करतात.

**गैरसमज क्रमांक ६** – एफडीवरील व्याज बँकेने दाखवले नाही तर कर लागत नाही

आजच्या डिजिटल युगात आयकर विभागाकडे एआयएस, टीआयएस आणि फॉर्म २६एएस च्या माध्यमातून बहुतांश आर्थिक व्यवहारांची माहिती उपलब्ध असते. त्यामुळे मुदत ठेवींवरील संपूर्ण व्याज उत्पन्न आयकर विवरणपत्रात दाखवणे आवश्यक आहे. टी.डी.एस झाला अथवा झाला नाही, यावर करपात्रता अवलंबून नसते.

**गैरसमज क्रमांक ७** – मुलांनी परदेशातून पाठवलेले सर्व पैसे करपात्र असतात परदेशात राहणाऱ्या मुलांनी आपल्या आई-वडिलांना आर्थिक मदत म्हणून पाठविलेली रक्कम सामान्यतः प्राप्तिकराच्या कक्षेत येत नाही. मात्र त्या रकमेची पुढील गुंतवणूक करून मिळणारे व्याज किंवा इतर उत्पन्न करपात्र असू शकते. त्यामुळे मूळ रक्कम आणि त्या रकमेवर मिळणारे उत्पन्न यामधील फरक समजून घेणे आवश्यक आहे.

**गैरसमज क्रमांक ८** – निवृत्त झाल्यावर आयकर रिटर्न भरण्याची गरज नसते. सेवानिवृत्ती म्हणजे आयकरातून सूट नव्हे. जर कायद्यानुसार रिटर्न भरण्याची अट लागू होत असेल, तर निवृत्त व्यक्तीनेही वेळेत आयकर विवरणपत्र भरले पाहिजे. नियमित रिटर्न भरणे भविष्यात बँक कर्ज, व्हिसा, आर्थिक व्यवहार, करपरतावा तसेच आयकर विभागाच्या पडताळणीसाठी उपयुक्त ठरते.

**वरिष्ठ नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी?**

करनियोजन करताना खालील बाबींचा विशेष विचार करावा-

- प्रत्येक वर्षी जुनी आणि नवीन करप्रणालीची तुलना करूनच पर्याय निवडावा.
- एआयएस, टीआयएस आणि फॉर्म २६एएस मधील माहिती तपासून आयकर विवरणपत्र भरावे.
- सर्व बँकांमधील व्याज, पेन्शन, भाडे, लाभांश आणि इतर उत्पन्नाची अचूक नोंद ठेवावी.
- आरोग्य विमा, गुंतवणूक, वैद्यकीय खर्च आणि इतर आवश्यक कागदपत्रे व्यवस्थित जतन करावीत.
- सोशल मीडियावरील अपूर्ण माहितीवर विश्वास न ठेवता तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

**निष्कर्ष :** करबचत म्हणजे केवळ कमी कर भरणे नव्हे, तर कायद्याच्या चौकटीत राहून उपलब्ध असलेल्या सवलतींचा योग्य लाभ घेणे होय. प्रत्येक वरिष्ठ नागरिकाची आर्थिक परिस्थिती वेगळी असल्याने करप्रणालीची निवडही वैयक्तिक स्वरूपाची असते. चुकीची माहिती, अपूर्ण मार्गदर्शन किंवा ऐकीव सल्ल्यावर अवलंबून राहिल्यास अनावश्यक कर, व्याज, दंड किंवा आयकर विभागाच्या नोटिसांचा सामना करावा लागू शकतो.

म्हणूनच, आयकर रिटर्न भरण्यापूर्वी आपल्या उत्पन्नाचे स्वरूप, उपलब्ध करसवलती आणि दोन्ही करप्रणालींचा तुलनात्मक अभ्यास करूनच अंतिम निर्णय घ्यावा. योग्य करनियोजन हे केवळ करबचतीचे साधन नसून आर्थिक सुरक्षिततेचा महत्त्वाचा पाया आहे. ■

९०९६३३२३५३
(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# सेवेतून दरवळतो भक्तीचा सुगंध!

जिव्हाळा कमी होतो आहे आणि देखावा वाढतो आहे. कृत्रिमतेचा भाव दिवसेंदिवस 'वधारत' असताना दुसरीकडे सेवाभाव तेवढाच 'खोल रुजतो' आहे. देशात सध्या दोन मोठ्या यात्रा सुरू आहेत. जगन्नाथपुरीतील महायात्रेसोबत नागपूर, वर्धेसह सर्वत्र जगन्नाथाची उप-शोभायात्रा निघाली आहे. महाराष्ट्रात विठू माउलीच्या दर्शनाची ओढ वारकऱ्यांना अजून जवळ घेऊन जाते आहे. आषाढ जवळ आला की महाराष्ट्राच्या मातीत चैतन्य संचारते. गावागावांतून टाळ-मृदंगाचा नाद घुमू लागतो आणि लाखो पावलं पंढरीच्या दिशेने निघतात. प्रत्येक पावलात भक्ती, प्रत्येक श्वासात नाम आणि प्रत्येकाच्या नजरेत विठ्ठलाच्या दर्शनाची आस असते. पण या लाखो पावलांबरोबर आणखी एक प्रवास सुरू असतो तो म्हणजे सेवेचा! वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राला एक मोठा संदेश दिला आहे. 'भक्ती आणि सेवा' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. विठ्ठलाच्या भेटीला जाणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करणे म्हणजे प्रत्यक्ष विठ्ठलाची सेवा असा भाव असतो. म्हणूनच या मार्गावर कोणी पिण्याचे पाणी देतो, गरम चहा, फराळ, अन्नदान, आरोग्य तपासणी, औषधं तर कोणी मुक्कामाची व्यवस्था करतो. या सेवेच्या परंपरेत एक अत्यंत हृदयस्पर्शी चित्र दिसते आहे. पालखी मार्गावर अनेक ठिकाणी नाभिक बांधव वारकऱ्यांची मोफत दाढी आणि केस कापून देत आहेत. अनेक दिवस चालत आलेल्या वारकऱ्यांना दाढी करून देणे, केस नीट करणे, त्यांना ताजेतवाने करणे म्हणजे त्यांच्या पुढील प्रवासाला नवचैतन्य देण्यासारखे नव्हे काय? पालखी मार्गावर अन्नछत्रही मोठ्या प्रमाणात उभारले जातात. तो प्रत्येक वारकऱ्यात माउली शोधत असतो. कुणी नाव विचारत नाही, जात विचारत नाही, धर्म विचारत नाही. तिथे फक्त एकच ओळख असते ती म्हणजे वारकरी! आज अनेक स्वयंसेवी संस्था आरोग्य शिबिरे भरवत आहेत. वैद्यकीय कर्मचारी दिवसरात्र सेवा करीत आहेत. काल-परवा तर एका पोलिस महिलेनेही वारकऱ्यांच्या दिंडीत घेर धरला. पोलिस प्रशासन लाखो वारकऱ्यांच्या संरक्षणासाठी पालखी सोबत आहेत. पण, सोबत असलेल्या महिला पोलिसाने 'राम कृष्ण हरी' म्हणत माउलीची सेवा केली. पोलिस इतरही दिंड्या-पालख्यांमध्ये संरक्षणासाठी असतात. त्यांच्या मनात भाव राहतही असेल. पण, तो प्रकट करता आला नाही. त्या भावाला प्रकट करण्याची संधी 'वारी'ने दिली. काय महानता आहे ना त्या वारीत आणि त्या सेवेत! वारीत जवळपास ३० लाख भाविक असतात. २०१४ मध्ये आयटीच्या विद्यार्थ्यांनी अभ्यास करत वारीत स्वच्छतेची वाट पकडली. २०१५ मध्ये 'निरामय वारी'ची संकल्पना मांडली. आता वारीमध्ये जवळपास ३६०० फिरते शौचालय आहेत. त्यामुळे वारीमध्ये अस्वच्छतेत ८० टक्के घट झाल्याचा दावा केला जातो आहे. यातून 'निर्मल वारी ते शाश्वत शेती' असा प्रयोग केला जातो आहे. यातून पांडुरंग, वारकरी आणि सोबत निसर्गाचीही सेवा होते आहे. पावसाळा लागतो. शेतीत पेरणी होते. बियाणी अंकुरतात आणि हा गावचा पाटील आणि गावकरी वारकरी होत सारी शेती त्या माउलीच्या भरोश्यावर सोडून विठुरायाच्या दर्शनासाठी निघून जातो. मग, तो विठुरायाच्या नामस्मरणात दंग होतो. त्याला देहभान नसते. अशावेळी त्याची दाढी-कटिंगही वाढलेली असते. त्यावेळी सेवेचा भाव जागृत ठेवत वारकऱ्यांची दाढी करतो. केस कापून देतो. त्यातून नाभिक पैसे कमावत नाही तर पुण्य कमावतात. डॉक्टर फी घेत नाही, तो समाधान मिळवतो. पंढरपूरचा विठ्ठल वारकऱ्यांच्या चेहऱ्यात, तो त्यांच्या धुळीने माखलेल्या पायांत, तो नामस्मरणात आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो सेवा करणाऱ्या प्रत्येक हातात आहे. आज समाजाला या सेवेच्या संस्काराची अधिक गरज आहे. लाखो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी निघाले आहेत. त्यांच्या पावलांबरोबर लाखो सेवाभावी हातही चालत आहेत. नवीन पिढीला सेवेचा भाव याच माध्यमातून आपोआप शिकवला जात आहे. अशीच सेवा प्रत्येक घरात लेक-सुनांच्या हातून मायबापाची घडावी... तेव्हा वृद्धाश्रमांची गरज निर्माण होणार नाही. मायबापाला घराबाहेर काढण्याची कुबुद्धी कोणाची होणार नाही. माउली त्यावेळी तुमच्या डोक्यावर हात ठेवल्याशिवाय राहणार नाही... माउलीचा प्रसाद आणि आशीर्वाद सर्व एकत्रच असेल... सेवेचा मेवा दीर्घकाळ टिकतो. मग वारीतील माउली असो, पंढरपुराच्या राऊळातील माउली असो की घरातील माउली; तिची सेवा नित्य घडत राहो... भक्तीचा गंध दरवळावा... सेवेचा आनंद असाच घेता यावा... वारी असो घरी! ■

९८८१९०३७६५

## डिजिटल जागृती

# वैयक्तिक माहिती म्हणजे नेमके काय?

**सीए अभय सगदेव**

**डीपीडीपी कायद्याची भाषा समजून घेऊया**

कल्पना करा की तुम्ही प्रथमच एका रुग्णालयात जाता. स्वागत कक्षावर तुमचे नाव, वय, मोबाईल क्रमांक, पत्ता, ई-मेल आणि आपात्कालीन संपर्क क्रमांक विचारला जातो. काही वेळाने प्रयोगशाळा तुमच्या रक्ताच्या नमुन्याची नोंद करते आणि बिलिंग विभाग तुमच्या पेमेंटची माहिती नोंदवतो. ही प्रत्येक माहिती स्वतंत्रपणे साधी वाटते, परंतु ती एकत्र आली की ती तुमची ओळख निर्माण करते. यालाच वैयक्तिक माहिती (पर्सनल डाटा) म्हणतात.

अनेकांना वाटते की वैयक्तिक माहिती म्हणजे फक्त आधार किंवा पॅन क्रमांक. प्रत्यक्षात डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा, २०२३ (डीपीडीपी ॲक्ट) यापेक्षा खूप व्यापक संकल्पना स्वीकारतो. वैयक्तिक माहिती (ओळख पटू शकणाऱ्या व्यक्तीबद्दलची कोणतीही माहिती) मध्ये नाव, छायाचित्र, मोबाईल क्रमांक, ई-मेल, पत्ता, आरोग्यविषयक माहिती, आर्थिक माहिती आणि व्यक्तीची थेट किंवा अप्रत्यक्ष ओळख पटवू शकणारी इतर माहिती यांचा समावेश होतो.

हा कायदा मुख्यतः डिजिटल पर्सनल डाटा (डिजिटल स्वरूपातील किंवा कागदावरून नंतर डिजिटल स्वरूपात रूपांतरित केलेली वैयक्तिक माहिती) यास लागू होतो. शाळा विद्यार्थ्यांची माहिती सॉफ्टवेअरमध्ये ठेवते, डॉक्टर इलेक्ट्रॉनिक वैद्यकीय नोंदी ठेवतात किंवा एखादा व्यापारी ग्राहकांची माहिती संगणकात जतन करतो, तेव्हा डिजिटल वैयक्तिक माहितीची प्रक्रिया होत असते.

प्रोसेसिंग (वैयक्तिक माहितीवर केली जाणारी कोणतीही कृती) हा आणखी एक महत्त्वाचा शब्द आहे. माहिती गोळा करणे, नोंद करणे, साठवणे, वापरणे, शोधणे, बदल करणे, इतरांना देणे किंवा हटविणे-हे सर्व



प्रोसेसिंगमध्ये येते.

डाटा प्रिंसिपल (ज्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती प्रक्रिया केली जाते ती व्यक्ती) हा या कायद्याचा केंद्रबिंदू आहे. माहिती तुमची असेल तर तुम्ही डाटा प्रिंसिपल आहात. अल्पवयीन मुलाच्या बाबतीत त्याचे हक्क सामान्यतः पालक किंवा कायदेशीर पालक वापरतात.

डाटा फिड्युशिअरी (वैयक्तिक माहिती कोणत्या उद्देशासाठी आणि कशाप्रकारे वापरायची हे ठरवणारी व्यक्ती किंवा संस्था) ही माहिती हाताळण्याबाबत जबाबदार असते. बँक, रुग्णालय, शाळा, नियोक्ता, ऑनलाईन विक्रेता किंवा व्यावसायिक हे परिस्थितीनुसार डाटा फिड्युशिअरी असू शकतात.

कधी कधी डाटा फिड्युशिअरी दुसऱ्या संस्थेकडून माहितीवर प्रक्रिया करून घेतो. अशा संस्थेला डाटा प्रोसेसर (डाटा फिड्युशिअरीच्या वतीने माहितीवर प्रक्रिया करणारी व्यक्ती किंवा संस्था) म्हणतात. उदाहरणार्थ, क्लाऊड सेवा पुरवठादार किंवा सॉफ्टवेअर सेवा देणारी संस्था.

कन्सेंट (योग्य त्या परिस्थितीत माहिती प्रक्रिया करण्यासाठी दिलेली संमती) आणि नोटीस (माहिती का व कशी वापरली जाणार आहे याची पूर्वसूचना) या दोन संकल्पना नंतर पाहू.

या संज्ञा समजल्या की, उर्वरित कायदा समजणे खूप सोपे होते. व्याख्या पाठ करण्यापेक्षा त्या आपल्या दैनंदिन जीवनात ओळखण्याचा प्रयत्न करा.

**दैनंदिन जीवनातील डीपीडीपी :** पुढच्या वेळी तुम्ही एखादे मोबाईल ॲप डाऊनलोड कराल, ते कोणकोणत्या परवानग्या मागते ते पाहा. टॉर्च ॲपला तुमचे संपर्क का हवेत? खरेदीच्या ॲपला कायम तुमचे स्थान का हवे? असे प्रश्न विचारण्यापासूनच जागरूक डिजिटल नागरिकाची सुरुवात होते.

**तुम्हाला माहिती आहे का? :** एका डिजिटल व्यवहारात तुमची माहिती बँक, पेमेंट गेटवे, व्यापारी आणि सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्म अशा अनेक संस्थांकडून प्रक्रिया केली जाऊ शकते. डीपीडीपी कायदा ही प्रक्रिया जबाबदारीने व्हावी यासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरवतो.

**लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे :** पर्सनल डाटा म्हणजे फक्त आधार किंवा पॅन नव्हे. कायदा मुख्यतः डिजिटल पर्सनल डाटावर लागू होतो.

प्रोसेसिंगमध्ये माहिती गोळा करणे, वापरणे, शेअर करणे आणि हटविणे यांचाही समावेश होतो. डाटा प्रिंसिपल, डाटा फिड्युशिअरी आणि डाटा प्रोसेसर या संकल्पना समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**विचार करा :** आज दिवसभरात किती संस्थांनी तुमच्या वैयक्तिक माहितीचा काही ना काही भाग गोळा केला? एकदा लक्ष देऊन पाहा-उत्तर तुम्हालाच आश्चर्यचकित करेल. ■

sagdeo1@gmail.com


## वाचक पत्रे

### ऐकावं ते नवलच!

संपूर्ण अधिक ज्येष्ठ, निज ज्येष्ठ महिना गेला; आषाढही सुरू झाला, परंतु पावसाने म्हणावी तशी हजेरी अजून लावली नाही. मध्ये पश्चिम महाराष्ट्रात पूर येण्याइतका पाऊस दोन दिवस कोसळला; आता परत दडी मारल्याने शेतीविषयक आणि आरोग्यविषयक अनेक समस्या उद्‌भवू लागल्या आहेत. दमट हवामानामुळे प्रचंड उकाडा वाढला आहे. कुठे अत्यल्प पाऊस पडूनही सिमेंट रस्ते असल्यामुळे पाणी लगेच साचलेले दिसून येत आहे. सर्वजण पावसासाठी साकडे घालत आहेत. परवा तर वाचनात आले, मौदा तालुक्यातील एका गावात पावसासाठी चक्क बाहुला-बाहुलीचे लग्न लावण्यात आले. वरुण राजाला पावसासाठी साकडे घालून पावसाची प्रतीक्षा संपावी म्हणून हे स्वयंवर रचण्यात आले आणि १०० पेक्षा अधिक वऱ्हाडी वरातीत सामील झाले. आता मात्र या सोहळ्यानंतर सगळ्यांना पावसाची चातकासारखी प्रतीक्षा आहे. वरुण राजा लवकर प्रसन्न होवो.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### वारी : मानवी मूल्यांची अन् संस्कृतीची शाळा



महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा म्हणजे वारी, महाराष्ट्राचे वैभव म्हणजे वारी. संतांची शिकवण म्हणजे वारी. वारीची परंपरा साधारणतः ८०० वर्षांहून अधिक काळापासून आहे. वारीची पद्धत काही संतांचे मते पुंडलिकामुळे विठ्ठल पंढरपूरमध्ये आले, त्यानंतर सुरू झाली तर काहींच्या मते आदिशंकराचार्यांपासून सुरू झाली. संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत यांनी आषाढ महिन्यात पंढरपूरला जाण्यासाठी वारी सुरू केली. दरवर्षी आषाढ महिना जवळ येताच महाराष्ट्रातील वातावरणात नामघोष, मृदंगाचा ताल आणि हजारो वारकऱ्यांच्या पावलांचा आवाज घुमू लागतो. आळंदी आणि देहूपासून पवित्र पंढरपूर शहरापर्यंत चालत जाणाऱ्या २१ दिवसांच्या आध्यात्मिक वारीत माणुसकीची ताकद अनुभवायला येते. या वाटेवर जात, वर्ग, किंवा अहंकाराला स्थान नसते. समाजपरिवर्तनाचा खरा बोध वारीतूनच शिकायला मिळतो. प्रत्येक वारकरी हा विठ्ठलाच्या पायी शरण आलेल्या भावात प्रकट होत असतो. वारीतील वारकरी म्हणजे चालत्या-फिरत्या उत्सवाचा भाग तर टाळ-मृदंगाच्या गजरात चालणारी निष्काम भक्तीचा आणि कष्टाचा असा प्रवास करीत असल्याचे दिसून येते. वारकरी हा पावसाची तमा न बाळगता, गावातील घरांमध्ये स्थानिक रहिवाशांच्या घरी, ज्याला यजमान कृत्य असे म्हणतात अथवा दिंडीच्या मुक्कामाच्या ठिकाणी (पालखी तळावर) तंबूत राहणे, साधे जेवणे आणि भक्तिरसात दंग झाल्याचे दिसून येतात. वारीतील रात्रीचा मुक्काम लोककलांच्या सादरीकरणाने आणि उत्साहामुळे एकतेचा उत्सव बनतो. वारी ही केवळ एक यात्रा नसून आत्माची शुद्धी आणि समाज जोडणारा एक मोठा सोहळा आहे. थोडक्यात सांगायचे तर वारी म्हणजे मानवाला माणुसकीचे धडे देणारी आणि एकमेकांशी जोडणारी तर मानवी मूल्यांची आणि संस्कृतीची जपणूक करणारी अनमोल जीवन शाळा आहे.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

### 'जावे त्याच्या वंशा'

काही वाक्यांचा अर्थ शब्दकोशात सापडत नाही. तो आयुष्याच्या अनुभवातून उलगडतो. 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे' ही म्हण त्यापैकीच एक. आयुष्याच्या प्रवासात अनेकदा आपण इतरांच्या वागण्याचा, निर्णयाचा किंवा भावनांचा न्याय करतो, पण जेव्हा तीच वेळ आपल्यावर येते तेव्हा आपल्या विचारांना एक नवी दिशा मिळते. लहानपणी वडीलधारी मंडळी काही गोष्टी सांगायचे, शिस्त लावायचे किंवा एखादा निर्णय घ्यायचे त्यावेळी तो अन्याय वाटायचा; पण जेव्हा स्वतःवर जबाबदाऱ्या स्वीकारण्याची वेळ आली तेव्हा त्यांच्या प्रत्येक निर्णयामागची काळजी, दूरदृष्टी, प्रेम समजून आले. तेव्हा मनात अनेक प्रश्न असायचे- असेच का? तसेच का? जसजसा काळ पुढे सरकत जातो तसे आयुष्य वेगवेगळे अनुभव देऊन जातात आणि तेव्हा त्या गोष्टी आठवतात आणि त्या प्रत्येक शब्दाची आठवण होते आणि कळतं किती खरं होतं ते सांगायचे ते. दुसऱ्याच्या आयुष्याकडे पाहून मत मांडणे खूप सोपे असते, पण तीच परिस्थिती स्वतःवर आली की प्रत्येक निर्णयाची विवशता आणि संघर्ष समजू लागतो. एखादा मित्र अडचणीत असताना आपण सहज सल्ला देतो पण तशीच अडचण स्वतःच्या आयुष्यात आली की लक्षात येतं सल्ला देणे सोपे असते, पण त्या परिस्थितीत टिकून राहणे कठीण असते. म्हणूनच अनुभव माणसाला नम्र बनवतो, तो इतरांविषयीचा दृष्टिकोन बदलतो आणि संवेदनशीलता वाढवतो. म्हणूनच 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे' ही म्हण आजही तितकीच जिवंत आणि सत्य आहे. काही गोष्टी ऐकून समजत नाहीत, त्या जगाव्या लागतात, अनुभवाव्या लागतात तेव्हाच इतरांच्या शब्दाचं आणि अनुभवाच मोल उमगत. दुसऱ्याचा न्याय करण्यापेक्षा त्याला समजून घेण्याचा प्रयत्न केला तर नाती अधिक सुंदर आणि समृद्ध होतील. ■

**सरिता पुराडभट**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादकः प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# केज उपजिल्हा रुग्णालयाचा कारभार; आरोग्य सेवेला मरणकळा ; रुग्णांची औषधोपचारा आभावी हेळसांड

**केज दि १६(प्रतिनिधी) :** केद शहरालगत असलेल्या उपजिल्हा रुग्णालयात पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी यांची १७ पदे मंजूर असताना रुग्णालयात सेवेसाठी केवळ तीन डॉक्टर उपलब्ध आहेत यामुळे रुग्णांची हेळसांड होत आहे.संतप्त झालेले रुग्ण

विना उपचार घेता परत जात आहेत. औषध उपचार अभावी रुग्णांना मरणकळा सहन कराव्या लागत आहेत

कोणत्याच विभागाचे तज्ञ डॉक्टर उपलब्ध होत नसल्याने केवळ चार गोळ्या घ्या आणि घरी जा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. एकूण परिस्थितीमुळे रुग्णांनी संताप व्यक्त केला आहे जिल्हा शल्य चिकित्सक याकडे का दुर्लक्ष करत आहेत हाच सवाल उपस्थित होत आहे.

रुग्ने सेवेसाठी असणाऱ्या डॉक्टरांपैकी तीन वैद्यकीय अधिकारी निलंबित झालेले आहेत, या बदल्यात कोणतेही डॉक्टर देण्यात आलेले नाहीत. निलंबित




वैद्यकीय अधिकारी तथा जनरल सर्जन डॉ दत्तात्रेय केंद्रे, भुलतज्ञ डॉ प्रणिता पाटील,स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ स्वाती साखरे,हे निलंबित आहेत. रुग्णालयातून डॉ सचिन रेडिओलॉजिस्ट डॉ सोनाली ठोकरे,यांची बदली इतरत्र करण्यात आली. त्यांच्या जागी कोणाचीही नियुक्ती करण्यात आलेली नाही. वैद्यकीय अधिकारी अस्थिरोग तज्ञ डॉ कृष्णा म्हात्रे यांना एक महिन्यासाठी पुणे येथे पाठवण्यात आले आहे.

डॉ सुशील पवार यांना जम्मू काश्मीर येथे रुग्णसेवेसाठी पाठवण्यात आले आहे. स्त्रीरोग तज्ञ डॉ केशव इंगोले यांना धारूर येथे वैद्यकीय अधीक्षक म्हणून पदभार देण्यात आलेला आहे

डॉ आयेशा अन्सारी, नेत्ररोग तज्ञ डॉ स्नेहल बालरोग तज्ञ डॉ निवृत्ती मुंडे,भुलरोग तज्ञ डॉ डी एस मुंडे हे वैद्यकीय कारण देवून रजेवर गेलेले आहेत.

रुग्णालयात उपलब्ध वैद्यकीय अधिकारी डॉ मुहम्मद हुसेन,डॉ समाधान घुगे,डॉ बी बी सावंत .

## सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या समर्थनात अंबाजोगाईकर एकवटले
## एकदिवसीय उपोषण सुरू



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई तालुका पत्रकार संघाचा पाठिंबा 'नीट' परीक्षा पेपर फुटीची जबाबदारी स्वीकारुन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी गेल्या 19 दिवसांपासून नवी दिल्ली येथील जंतर - मंतर येथे उपोषणासाठी बसलेल्या सोनम वांगचुक यांचे उपोषण तात्काळ सोडवण्यात यावे, या मागणीसाठी आज दिनांक 17 जुलै शुक्रवार रोजी अंबाजोगाईकर एकवटले असून येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोनम वांगचुक यांच्या समर्थनात पत्रकार परमेश्वर गित्ते, शेख नईम यांच्यासह सामाजिक कार्यकर्त्यांनी एकदिवसीय उपोषण सुरु केले आहे. दुसरीकडे त्याच ठिकाणी सोनम वांगचुक यांच्या समर्थनात सजग अंबाजोगाईकरांनीही एकदिवसीय उपोषणाला सुरुवात केली आहे. या दोन्ही उपोषणाला विविध स्तरांतून पाठिंबा मिळत असून अंबाजोगाई तालुका पत्रकार संघानेही जाहीर पाठिंबा दर्शविला आहे, अशी माहिती संघाचे अध्यक्ष महादेव गोरे यांनी दिली आहे.

'नीट' परीक्षा पेपर फुटीची दखल घेऊन अभिजित दिपके यांच्या पुढाकाराने नवी दिल्ली येथील जंतर - मंतर वर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी निदर्शने करण्यात आल्यानंतरही त्यांनी राजीनामा न दिल्याने सोनम वांगचुक यांनी 30 जूनपासून जंतर - मंतर येथे बेमुदत उपोषण सुरु केले आहे. या उपोषणासंदर्भात केंद्र शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असून धर्मेंद्र प्रधान यांना पाठिशी घालत आहे.

या सर्व घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी आज पत्रकार परमेश्वर गित्ते यांच्यासह सजग अंबाजोगाईकरांच्या वतीने 17 जुलै रोजी सोनम वांगचुक यांचे उपोषण तातडीने सोडवण्यासाठी केंद्र शासनाने केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या दोन्ही एकदिवसीय उपोषणाला विविध राजकीय पक्षांचा, सामाजिक संघटनांचा, सामाजिक कार्यकर्त्यांचा, डॉक्टर, वकील, पत्रकार, प्राध्यापक, शिक्षणप्रेमींचा मोठ्या संख्येने पाठिंबा मिळत आहे.

### पंकजाताई मुंडे यांनी घेतला परळी मतदारसंघातील बुथचा आढावा

# बूथ मजबूत तर यश निश्चित; एसआयआर मोहिमेत शंभर टक्के योगदान द्या

### बूथ मॅपिंग शंभर टक्के पूर्ण करणाऱ्या बीएलए -2 कार्यकर्त्यांचा केला सत्कार

**परळी वैजनाथ, दि. १६ :** बूथ हा पक्ष संघटनेचा कणा आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या बूथशी सातत्याने संपर्क ठेवून जनतेच्या समस्या जाणून घ्याव्यात. शंभर टक्के बूथ मॅपिंग पूर्ण करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आदर्श निर्माण केला आहे. आगामी काळात संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि जनतेपर्यंत शासनाच्या योजना प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे. कार्यकर्त्यांची मेहनत आणि जनतेचा विश्वास हीच भाजपची खरी ताकद आहे. सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत सर्वांनी आपापल्या बुथची शंभर टक्के मॅपिंग करावी आणि आपल्या संघटनात्मक कामासह राष्ट्रीय



कर्तव्य बजवावे असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले.

सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर परळी वैजनाथ येथे भाजपाच्या बी एल ए- दोन म्हणून जबाबदारी असलेल्या ३६२ कार्यकर्त्यांची ना.पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली, त्यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीत एसआयआर मोहिमे अंतर्गत झालेल्या कामाचा, याचबरोबर प्रत्येक बूथ निहाय संघटनात्मक कामांचा आढावा घेण्यात आला. तसेच आगामी नियोजन, बूथ व्यवस्थापन आणि पक्षाच्या विविध उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवत संघटन मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## नवनियुक्त केंद्रप्रमुख व साधन व्यक्ती गौरव सोहळा संपन्न



**माजलगाव, दि. १६ जुलै :** शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, माजलगाव यांच्या वतीने नवनियुक्त केंद्रप्रमुख तसेच समग्र शिक्षा अभियान अंतर्गत सेवेत कायम आदेश व वेतनश्रेणी प्राप्त झालेल्या साधन व्यक्ती व विषय तज्ञ यांच्या गौरवार्थ आयोजित करण्यात आलेला भव्य सत्कार समारंभ गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी 'रयतभवन', तुळजाभवानी अर्बन, माजलगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जिजाऊ वंदना घेण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त केंद्रप्रमुख तसेच समग्र शिक्षा अभियानातील साधन व्यक्ती यांचा पुष्पहार, प्रतिमा व ग्रंथभेट देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. सेवेत कायम आदेश व वेतनश्रेणी प्राप्त झाल्याबद्दल सर्व सत्कारमूर्तींचे अभिनंदन करण्यात आले.

याप्रसंगी नवनियुक्त केंद्रप्रमुख पद्माकर शिंदे, नामदेव आपेट, अंबिका कुचेकर, राजेभाऊ घुबडे,अश्रुबा बोर्डे, प्रकाश शिंदे व साधन व्यक्ती लक्ष्मण पोटभरे,सचिन मोती, आयाज सिद्दिकी,अलका कदम, संजय राठोड, उद्धव लेंडगुळे, अभियंता भागवत वनवे, तसेच याप्रसंगी गडकिल्ले संवर्धन व ट्रेकिंग क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल शिवराष्ट्र हायकर्स, कोल्हापूर यांच्याकडून 'शिवराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित झालेल्या कृष्णा तौर यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजयसिंह सोळंके तर प्रमुख पाहुणे म्हणून अर्जुन वाघ, अशोकराव शेजुळ,गणेश ढीसले, सोमेश्वर मोरे,फुलचंद इंगोले, डी. के. चव्हाण,अरविंद देशमुख उपस्थित होते.

यावेळी सर्व उपस्थित शिक्षकांनी "जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी संख्या वाढविणे आणि प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे" हा सामूहिक संकल्प केला. शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमास शिक्षक परिषदेचे पदाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, साधन व्यक्ती, विषय तज्ञ तसेच शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिलीप धुमाळ यांनी सूत्रसंचालन, तालुकाध्यक्ष नारायण झोडगे यांनी प्रास्ताविक व मुकूंद सोळंके यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुरुषोत्तम जाधव, विलास शेजुळ,विनोद ठोंबरे,ज्ञानेश्वर थेटे, सुधाकर जाधव,उत्तम पवार, रामदास कापसे, हनुमान होके, गणेश घाटूळ,बालासाहेब काकडे,शरद नायबळ,विनोद गायकवाड, विकास गायकवाड, विजय कटारे, जीवन डोंगरे, कलीम शेख,अमोल गालफाडे,रवींद्र वळसे संतोष गिरे, गणेश दळवी यांनी परिश्रम घेतले.

# धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या!; २० जुलै रोजी लॉंग मार्च; उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे विद्यार्थी व नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

**अंबाजोगाई :** नीट परीक्षा पेपर फुटीची जबाबदारी स्विकारुन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी गेली २० दिवसांपासून नवी दिल्ली येथील जंतर मंतर येथे उपोषणासाठी बसलेल्या सोनम वांगचुक यांचे उपोषण तात्काळ सोडवण्यात यावे व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा या मागणीसाठी सजग अंबाजोगाईकरांच्या वतीने २० जुलै रोजी दुपारी १२ वाजता नगर परिषद कार्यालय परिसरातुन उपजिल्हाधिकारी कार्यालयावर लॉंग मार्च काढण्यात येणार असून दुपारी २ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत उपजिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या सर्व आंदोलनात शहरातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सजग अंबाजोगाईकर समुहाच्या वतीने करण्यात आले आहे.

नीट परीक्षा पेपर फुटीची नैतिक जबाबदारी स्विकारुन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा व भ्रष्ट शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी शैक्षणिक धोरणात अमुलाग्र बदल करण्यात यावा या प्रमुख मागणीसाठी ज्येष्ठ पर्यावरणवादी नेते, सामाजिक कार्यकर्ते तथा संशोधक सोनम वांगचुक यांनी ३० जून पासून जंतर मंतर येथे बेमुदत उपोषण सुरु केले आहे. आज या उपोषणाला २० दिवस होवून गेले तरी केंद्र शासन या उपोषणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे.

या सर्व घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी लोकसभा अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी

२० जुलै रोजी देशभरातील विविध संघटनांनी एकत्र येऊन जंतर मंतर ते लोकसभा भवनावर लॉंग मार्च काढण्याचे नियोजन केले आहे. याचाच एक भाग म्हणून देशभरातील उपजिल्हाधिकारी कार्यालया समोर स्थानिक लोकांनी वेगळे उपक्रम राबवावेत असे आवाहन सोनम वांगचुक यांनी केले आहे.

या आवाहनाला प्रतिसाद देत सजग अंबाजोगाईकर



समुहाच्या वतीने २० जुलै रोजी दुपारी १२ वाजता नगर परिषद कार्यालय परिसरातुन उपजिल्हाधिकारी कार्यालयावर लॉंगमार्च काढण्यात येणार असून दुपारी २ ते सायंकाळी ४ वाजे पर्यंत उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

या आंदोलनात सहभागी होणा-या सर्व विद्यार्थी व नागरिकांनी नगर परिषद कार्यालय परिसरात दुपारी १२ वाजेपर्यंत एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दुपारी १ वाजता हा समुह अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, बस स्थानक, स्वातंत्र्य वीर सावरकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर जमणार आहे. याठिकाणी या आंदोलनात सहभागी झालेल्या विविध संघटनांचे प्रतिनिधी या आंदोलनाला संबोधित करतील.

यानंतर या संदर्भात उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येवून धरणे आंदोलनाची सांगता होणार आहे.

शिस्तबद्ध नियोजन

ज्येष्ठ पर्यावरणवादी नेते सोनम वांगचुक हे स्वतः गांधीवादी नेते असल्यामुळे हे सर्व आंदोलन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने करण्याचा प्रयत्न सजग अंबाजोगाईकर समुहाच्या वतीने करण्यात येणार आहे. या आंदोलनात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मागितला जाणार आहे. तर सोनम वांगचुक यांनी देशातील शिक्षण व्यवस्थेत सुधारणा आणण्यासाठी सुरु केलेल्या या आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांना आवाहन

हे आंदोलन नीट पेपर फुटी ची नैतिक जबाबदारी स्विकारुन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा या मागणीसाठी व भ्रष्ट शिक्षण पध्दतीत अमुलाग्र सुधारणा करण्यात याव्यात यासाठी असल्यामुळे या आंदोलनात शहरातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, व संयोजकांनी दिलेल्या शिस्तीचे, पालन करावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

नागरिकांना आवाहन

सजग अंबाजोगाईकर समुहाच्या वतीने २० जुलै रोजी करण्यात येणाऱ्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी दुपारी १२ वाजता

नगर परिषद कार्यालय परिसरात अंबाजोगाईकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अमर हबीब, ॲड. अजय बुरांडे, कॉ. बब्रुवान पोटभरे, प्रा. अरुंधती पाटील, सुदर्शन रापतवार, धिमंत राष्ट्रपाल, अशोक पालवे, ॲड. माणिक आदमाने, ॲड. शिवाजी कांबळे, रामकिसन मस्के, महेंद्र निकाळजे, अनिकेत लोहिया, कालिदास आपेट, अच्युत गंगणे, दगडू लोमटे, प्रा. शैलजा बरुरे, बुध्दकिरण जोगदंड, प्रशांत मस्के, सुहास चंदनशिव, रत्नदीप सरवदे, प्रसन्नजित इंगळे, अरुण बनसोडे, आणि इतरांनी केले आहे.

## इस्कॉन बीडच्या वतीने श्री जगन्नाथ भगवंतांच्या रथयात्रेचे आयोजन

**बीड (प्रतिनिधी):-** दरवर्षीप्रमाणे श्री श्री राधा गोविंद मंदिर (इस्कॉन) बीडच्या वतीने रविवार दि.19 जुलै 2026 रोजी भव्य दिव्य अशी श्री जगन्नाथ बलदेव सुभद्रा रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील भावीक भक्तांना दर्शन देण्यासाठी भगवान श्री जगन्नाथांचा रथ दुपारी 2 वाजता श्री श्री राधा गोविंद मंदिर, श्री संत सावता माळी चौक, हनुमान मंदिर, माळीवेस, सुभाष रोड, अण्णाभाऊ साठे चौक, जालना रोड, शिवशारदा बिल्डिंग, जिजामाता चौक मार्गे रात्री 8 वाजता श्री श्री राधा गोविंद मंदिर येथे पोहोचेल. सदरील रथयात्रेत इस्कॉन दक्षिण आफ्रिकेचे वरिष्ठ संन्यासी प.पू. रामगोविंद महाराज तसेच कृष्णभक्त प्रभुजी इस्कॉन अध्यक्ष, सोलापूर तथा विभागीय पर्यवेक्षक हे उपस्थित राहणार आहेत. तरी बीड शहरातील सर्व भावीक-भक्तांनी भगवान जगन्नाथांचा कृपाशीर्वाद प्राप्त करावा असे आवाहन इस्कॉन बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील हर्षवर्धन सुरेश जाधव या विद्यार्थ्याचे नीट परीक्षेत यश



**किल्लेधारुर - 17 जुलै :** येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील कनिष्ठ विभागातील विज्ञान शाखेतील चि. हर्षवर्धन सुरेश जाधव या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय प्रवेश परीक्षेसाठी आयोजित केलेल्या (NEET) नीट परीक्षेत (रँक -7426) 609 गुण प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते शाल व पुष्पहार देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. धनराज सोळंके, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ, प्रा. सिद्धेश्वर काळे, प्रा. संदीप गायकवाड, प्रा. बुटे यांबरोबर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

# "गाव करी ते राव न करी" : लोकसहभागाची ताकद!

## महाराष्ट्रात दुर्मिळ व मराठवाड्यात एकमेव : टोकवाडी जिल्हा परिषद शाळेसाठी सुरू झाली स्कूलबस

**परळी वैजनाथ (श्रीराम लांडगे) :** "गाव करी ते राव न करी" अशी म्हण प्रचलित आहे. गावाने ठरवलं तर अशक्य काहीच नाही. याची प्रचिती परळी तालुक्यातील टोकवाडी ग्रामस्थांनी पुन्हा एकदा करून दिली आहे. ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ यांच्या एकजुटीतून टोकवाडी जिल्हा परिषद शाळेसाठी स्कूल बस सुविधा सुरू करण्यात आली असून ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे. आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १५ जुलै रोजी या स्कूल बस सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी स्वतंत्र स्कूल बस असणे ही दुर्मिळ बाब मानली जाते. मात्र टोकवाडीने केवळ शासनाकडे अपेक्षा न ठेवता लोकसहभागाच्या बळावर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा आणि शिक्षणाचा प्रश्न सोडविला आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ बस सुरू करण्यापुरता मर्यादित नसून गावाने आपल्या शाळेची जबाबदारी स्वीकारल्याचा आदर्श संदेश देणारा ठरला आहे.

टोकवाडी हे गाव यापूर्वीही ग्रामस्वच्छता, तंटामुक्ती, ग्रामसमृद्धी, "माझी शाळा सुंदर शाळा" यांसारख्या विविध शासकीय स्पर्धांमध्ये अव्वल स्थान पटकावत राज्यभरात आपली वेगळी ओळख निर्माण करत आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा उपक्रमातही गावाच्या जिल्हा परिषद शाळेची निवड झालेली आहे. संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, आर आर



आबा पाटील सुंदर गाव योजना, सरपंच ऑफ द इयर लोकमत, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान इत्यादी महत्त्वाचे पुरस्कार मिळालेले आहेत.आता स्कूल बसच्या माध्यमातून गावाने शिक्षण क्षेत्रातील आणखी एक आदर्श निर्माण केला आहे.

महामार्गालगत वसलेल्या टोकवाडी गावात वाहनांची मोठी वर्दळ असते. तसेच गावाबाहेरील वस्त्या, शेतातील आखाडे आणि वीटभट्ट्यांवर राहणाऱ्या कामगारांची मुले यांना शाळेत येण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. काही वेळा सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होत होता. या समस्येची जाणीव गावकऱ्यांनी मनापासून घेतली आणि सर्वांनी मिळून त्यावर कायमस्वरूपी उपाय शोधला. त्यातूनच स्कूल बसची संकल्पना प्रत्यक्षात उतरली. या बसमुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित, वेळेवर आणि सुलभ प्रवासाची सुविधा मिळणार असून शिक्षणापासून एकही मूल वंचित राहू नये, हा गावाचा संकल्प अधिक बळकट होणार आहे. विशेष म्हणजे हा उपक्रम शासनाच्या आदेशाने नव्हे तर गावकऱ्यांच्या सामाजिक बांधिलकीतून आणि शिक्षणावरील प्रेमातून साकार झाला आहे.

आज अनेक गावांमध्ये शाळांतील पटसंख्या घटत असल्याची चिंता व्यक्त केली जाते. अशा वेळी गाव, पालक, शिक्षक आणि स्थानिक नेतृत्व एकत्र आले तर जिल्हा परिषद शाळाही गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र बनू शकते हे टोकवाडीने दाखवून दिले आहे. टोकवाडीचा हा उपक्रम केवळ एका गावाचा गौरव नसून, ग्रामीण महाराष्ट्रातील प्रत्येक गावासाठी प्रेरणेचा आणि अनुकरणीय आदर्शाचा विषय ठरत आहे.

### आ. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून स्कूल बससेवेचा शुभारंभ

शाळा आपली, विद्यार्थी आपले आणि जबाबदारीही आपलीच हा संदेश देत टोकवाडीने लोकसहभागाच्या बळावर शिक्षण विकासाचा नवा अध्याय लिहिला आहे. परळी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या बससेवेचा शुभारंभ करण्यात आला अशी माहिती सरपंच सौ.गोदावरी राजाराम मुंडे यांनी दिली.

# राजकीय वर्चस्व आणि अवैधधंद्यांच्या चढाओढीत हिंगोलीत गँगवार ?

## तडीपार गुंडांना राजकीय वरदहस्त, हिंगोलीत बंदुका येतात कुठून ?

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**

जिल्ह्यात मागील काही वर्षापासून तरूण पिढी राजकीय क्षेत्रात करीअर करण्यासाठी आपआपल्या नेत्याला खुश करण्यासाठी वाट्टेल ते करायला तयार दिसत आहेत. दुसरीकडे जिल्ह्यात मटका, जुगार, अवैध गुटखा विक्री तसेच अवैध वाळू विक्री यांमध्ये मोठ्या प्रमाणात कमी वेळात पैसा मिळत असल्यामुळे तरूण पिढी गुन्हेगारीकडे वळतांना दिसत आहे. त्यामुळे जिल्ह्यात मागील काही वर्षात गँगवार सुरू झाले असून अनेकांकडे बंदुका सापडण्याच्या घटना घडल्या आहेत. या बंदुका हिंगोलीत येतात कुठून? याचा शोध लावणेही पोलिसांसमोर आता मोठे आव्हान आहे. पोलिस विभागातील डीएसबी शाखा काय करीत आहे? असा सवाल सर्वसामान्य नागरिक विचारीत आहे.

हिंगोली जिल्ह्यात मागील काही वर्षापासून मटका, जुगार, अवैध दारूविक्री, अवैध गुटखा विक्री तसेच अवैध वाळू विक्री मोठ्या प्रमाणावर होत आहे. या धंद्यांमध्ये गुन्हेगारी वृत्ती असलेली मोठी मंडळी गावखेड्यापासून ते शहरापर्यंत सहभागी आहेत. महसूल विभागाच्या पथकांवर अनेकवेळा जीवघेणे हल्ले या गुंड प्रवृतीच्या लोकांनी केल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यात भर म्हणून अशा लोकांना राजकीय वरदहस्त मिळत असल्यामुळे महसुल विभागातील अधिकारी व कर्मचारी या लोकांवर कार्यवाही करण्यास धजत नसल्याचे दिसत आहे. पोलिस विभागाकडून अनेकांवर कारवाई करण्यात येते परंतु त्यानंतरही पुन्हा अवैध धंदे जिल्ह्यात चोरीछीपे होतच आहेत. त्यामुळे जिल्ह्यात गुन्हेगारीच्या प्रमाणात मोठ्या संख्येने वाढ होत असतांना दिसत आहे.

कळमनुरी येथील घटना याचाच परिपाक असल्याचे बोलले जात आहे. एकाच राजकीय पक्षातील दोन गटात हाणामारी झाली. या हाणामारीत चक्क बंदुकीचा वापर करण्यात आला. यावेळी पंधरा ते सोळा राऊंड फायर झाल्याचे सांगितले जात आहेत. या घटनेत एकाचा बळी गेला असून दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. दोन गटात राजकीय वर्चस्व निर्माण करण्यासाठी तसेच अवैध धंद्यांमध्ये चढाओढ असल्यामुळे हा संघर्ष एकमेकांचा जीव घेण्यापर्यंत पोहोचला.

जिल्ह्यातून हद्दपार केलेले अनेकजण चोरून लपून पुन्हा हद्दपारीचे आदेशाचे उल्लंघन करीत त्या त्या भागात मोकाटपणे फिरत असल्याचे बोलले जात आहे. याला जबाबदार कोण आहे? हे गुन्हेगार समाजात मोकाटपणे फिरून इतरांना गुन्हे करण्यास भाग पाडत आहेत. त्यांच्यावर राजकीय वरदहस्त ठेवणारे राजकीय पुढारीही या गुन्हेगारीला तेवढेच जबाबदार आहेत. पोलिस विभागाने हद्दपार केलेल्या आरोपींवर करडी नजर ठेवून त्यांना पुन्हा जिल्ह्याच्या बाहेर काढण्याचे काम केले पाहीजे अशी मागणीही होत आहे. जिल्ह्यात राजकीय वरदहस्तामुळे गाव खेड्यापासून ते शहरापर्यत टोळ्या निर्माण झाल्या आहेत. अशा टोळ्यांवर करडी नजर ठेवून त्यांना पायबंद करणेही आवश्यक आहे.

काही महिन्यांपूर्वी भाजयुमोचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष यांच्यावर जिल्हा परिषदेत भरदिवसा गोळीबार करण्यात आला होता. या घटनेनंतरही आणखी गँगवारच्या मोठ्या घटना घडल्या आहेत. या टोळ्यांना अभय देणारे राजकीय पुढारी आणि पदाधिकारी तरूणांच्या बेरोजगारीचा गैरफायदा घेत त्यांना गुन्हेगारी जगात ढकलत असल्याचे दिसत आहे. या तरूणांच्या पालकांनीही त्यांचे मुले कोणत्या मार्गावर जात आहेत याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

जिल्ह्यात अवैध धंद्यांमुळे गुन्हेगारी वाढत असून जोपर्यंत १०० टक्के अवैध धंदे बंद करण्यासाठी महसूल विभाग, पोलिस विभाग कठोर भूमिका घेत नाही तोपर्यंत अशाप्रकारचे गँगवार जिल्ह्यात थांबणार नाहीत. हद्दपार केलेल्या गुन्हेगारांचा शोध धेवून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची गरज असून त्यासाठी पोलिस विभागाने ठोस पावले उचलण्याची गरज आहे. कोणत्याही राजकीय दबावाला न जुमानता कर्तव्य पार पाडल्यास अशा घटनांना आळा बसेल अशी भावना व्यक्त होत आहे.

# पंचायत समितीमध्ये जनगणना २०२७ कार्यक्रमाचे प्रशिक्षण

## प्रशिक्षणाधिकारी संदीप कुलकर्णी यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**



औंढा येथील पंचायत समिती सभागृहात जनगणना २०२७ कार्यक्रमाच्या अनुषंगाने शुक्रवार १७ जुलै रोजी दोन सत्रात प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील प्रशिक्षण हरीश गाडे तहसीलदार तथा चार्ज अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. या प्रशिक्षणास संदीप कुलकर्णी जनगणना अधिकारी प्रशिक्षक आणि मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणास नायब तहसीलदार प्रवीण ऋषी, निवडणूक नायब तहसीलदार प्रभाकर काळे, सचिन शिरसागर ,नितीश कुलकर्णी, प्रियका इंगोले जनगणना सहाय्यक तांत्रिक अधिकारी होते. जनगणना २०२७ साठी गाव निर्देशिका डेटा संकलनाचे काम सुरु होणार आहे. त्याअनुषंगाने आपल्या अधिनस्त गावांची माहिती गाव निर्देशिकामध्ये सुविधांसाठी माहिती संकलन (शैक्षणिक सुविधा, वैद्यकिय सुविधा, पाणी आणि स्वच्छता, दळणवळण, वाहतुक सुविधांसाठी माहिती व संपर्क यंत्रणा, बँका, पतपुरवठा आणि इतर संकिर्ण सुवीधा, वीज आणि इतर उर्जा/इंधनाची उपलब्धता, जमिनीचा वापर आणि सिंचन, मुख्य कृषी वस्तु, उत्पादने आणि हस्तकला इ.) करण्याची सर्वस्वी जबाबदारी राहिल. यावर संदीप कुलकर्णी यांनी सखोल मार्गदर्शन केले.

सदरील प्रशिक्षण पहिले सत्र सकाळी दहा ते दोन व दुसरे सत्र दुपारी तीन ते पाच अशा दोन सत्रात घेण्यात आले. या प्रशिक्षणास ग्राम महसूल अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशिक्षणास नितीश कुलकर्णी, विजय कदम, सचिन क्षीरसागर, केशव फलटणकर, संदीप मुंडे, विशाल भुक्तर,किसन फलटणकर, गणेश महुरे, दीपक जाधव, विष्णु गिरी, विनोद घोडके यांनी परिश्रम घेतले.

# जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करा- शशीकांत शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटन तळागाळापर्यंत नेऊन जनतेच्या प्रश्नावर रस्त्यावर उतरून संघर्ष करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे यांनी मार्गदर्शन करतांना केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष माजी सहकार मंत्री जयप्रकाश दांडेगावक, माजी आमदार सुनील भुसारा, माजी आमदार विजयराव गव्हाणे, प्रदेश सरचिटणीस डॉ.भीमराव हत्तीअंभीरे, जिल्हा निरीक्षक पंकज बोराडे, अमित खडसे यांनी मार्गदर्शन केले.

या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे हिंगोली जिल्हा उपाध्यक्ष अॅड. रवि शिंदे, विधानसभा अध्यक्ष बंडू मुटकुळे, गणेशराव गडदे, माजी जि.प.उपाध्यक्ष मनीष आखरे, माधव कोरडे, युवक जिल्हाध्यक्ष सोनू चव्हाण, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष व्यंकटेश जोगदंड, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष आयुबभाई पठाण, अनुसूचित जाती आघाडी जिल्हाध्यक्ष भास्कर कुरे,तालुकाध्यक्ष डॉ.संतोष बोंढारे, धीरज काकडे, गजानन गव्हाणे, शहराध्यक्ष मुजीब पठाण मोईन बागवान, दिलीपराव राखोंडे, सिराजभाई कुरेशी, आनंदराव कदम, अभिजीत देशमुख, डॉ.वेदांत मरळे, प्रा.गजानन थोरात, युवक तालुकाध्यक्ष सुशील बोंढारे, रमेश जाधव, राजू बाभळे, विनायक माखणे, सुनील मस्के, गणेशराव लेकुळे, प्रभू शिंदे, प्रफुल पाईकराव, उत्तम पोटे, लक्ष्मण पोटे, सुभाष सरडे, सुभाष सापनार, प्रदीप बरडे, मुंजाजी बर्गे, गणपत चिरमाडे, देविदास शेंबडे, अनोज वायकोळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली- शहरातील संत नामदेव पोलिस कवायत मैदानालगत पोलिस कर्मचाऱ्यांसाठी पोलिस क्वार्टर बांधण्यात येत आहेत. या इमारतीचे काम आता अंतिम टप्प्यात असून लवकरच पोलिस कर्मचाऱ्यांना ही क्वार्टर उपलब्ध होणार आहेत. छाया- विजय गुंडेकर**


## संक्षिप्त वृत्त

### सांदीपनीमध्ये कालिदास दिन साजरा



हिंगोली- आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी संपूर्ण जगभरात संस्कृत भाषेतील महाकवी कालिदासांच्या सन्मानार्थ कालिदास दिन साजरा केला जातो. या निमित्ताने सांदीपनी पब्लिक स्कूल, तरोडा (बु), नांदेड येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात सौख्या पालिमकर व आर्या कदम यांनी प्रभावी भाषण सादर केले, तर प्रणवी आऊलवार व मृणाल राठोड यांनी कालिदासांच्या जीवनावर आधारित आकर्षक भित्तीपत्रक सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाला संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका हरप्रीत कौर तसेच प्रशासक मारुती मेखाले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोगदंड खंडू यांनी उत्तमरीत्या पार पाडले. या सर्व विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन संस्कृत विषयाचे सहशिक्षक गोविंद पांचाळ यांनी केले.

### शाळेकडून दंड वसूल करण्याची मागणी



हिंगोली- शहरातील नारायणा ई टेक्नो इंग्रजी शाळेला युडायस क्रमांक नसल्यामुळे या शाळेला शिक्षण विभागाने ३३ लाख ६० हजारांचा दंड लावून दंड भरेपर्यंत शाळेला सील ठोकले होते परंतु दि ११ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षण विभागाने आकारण्यात आलेला दंड वसूल न करता शाळेला मान्यता दिली असा आरोप सामाजिक कार्यकर्ते मुनीरखान पठाण यांनी केला असून दंड न वसूल करता शिक्षण विभागाने मान्यता कशी दिली असा सवाल करीत यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांना मागणीचे निवेदन सादर केले आहे.

### स्मार्ट मीटर विरोधात राष्ट्रवादीचे निवेदन

हिंगोली- राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे यांच्या नेतृत्वात दि १६ जुलै रोजी महावितरण कार्यालयात स्मार्ट मीटर विरोधात निवेदन सादर करण्यात आले. यावेळी माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, माजी जि प उपाध्यक्ष मनीष आखरे, जिल्हा उपाध्यक्ष अॅड रवि शिंदे, बंडू मुटकुळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# भूजल संवर्धनासाठी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**



पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अधिपत्याखालील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या ५५ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये जलसाक्षरता, भूजल संवर्धन आणि पाणी गुणवत्तेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने जलजागृती कार्यशाळा तसेच जिल्हा पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा, हिंगोली येथे अभ्यासदौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

येथील शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालयात आयोजित कार्यशाळेत विद्यालयाचे उपमुख्याध्यापक लोळेवार, पंडित शिरसाठ, ए एस गिराम तसेच श्रीमती पानपट्टे यांनी विद्यार्थ्यांना जलसंवर्धन आणि पाणी गुणवत्तेचे महत्त्व समजावून सांगत कार्यक्रमास सहकार्य केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. बी. एन. संगणवार यांनी विद्यार्थ्यांना भूजलाचे वाढते महत्त्व, जलस्रोतांचे संवर्धन, पावसाच्या पाण्याचे संकलन, भूजल पुनर्भरण आणि प्रत्येक नागरिकाची जलसंवर्धनातील जबाबदारी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी सहाय्यक भूवैज्ञानिक दीपक वाबळे यांनी भूजलाचे स्त्रोत, भूजल पुनर्भरण आणि हिंगोली जिल्ह्याची भूजल परिस्थिती या विषयावर माहितीपूर्ण सादरीकरण करून विद्यार्थ्यांना भूजल व्यवस्थापनाची माहिती दिली. तसेच जिल्हा पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळेचे रसायणी प्रफुल्ल विणकरे यांनी पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, पाणी तपासणीचे महत्त्व आणि दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सचिन भगत यांनी केले. या कार्यशाळेनंतर २९ विद्यार्थ्यांनी जिल्हा पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळेला अभ्यासदौरा केला. या अभ्यास दौऱ्यादरम्यान प्रफुल्ल विणकरे (रसायणी) आणि संतोष बेले (अणुजैविक तज्ज्ञ) यांनी प्रयोगशाळेतील अत्याधुनिक उपकरणे, पाणी गुणवत्ता तपासणीची वैज्ञानिक कार्यपद्धती, विविध रासायनिक व अणुजैविक चाचण्या तसेच दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांविषयी सविस्तर माहिती दिली. या उपक्रमासाठी सिद्धार्थ रणवीर, सचिन भगत आणि शिवशंकर भोयर यांनी सहकार्य केले. यावेळी पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळेच्या परिसरात अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रमेश रिठे, सय्यद आशपाक, अनिल सोळंके, राजेश राठोड, मनमथ व्यवहारे यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत भूजल संवर्धन, जलसाक्षरता आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्याविषयी महत्त्वपूर्ण माहिती आत्मसात केली.

# सहकारी संस्थेवर उमेश नागरे यांची बिनविरोध निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**

जिल्हा स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्थेचे फेडरेशन मर्यादित, सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठीच्या निवडणूक प्रक्रियेत भाजपचे जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे यांची संचालकपदी बिनविरोध निवड झाली आहे. या निवडी बद्दल आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या जनसंपर्क कार्यालयात भाजपा प्रदेश कार्यालयीन सहमंत्री भाऊराव देशमुख यांच्या हस्ते नागरे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, विलास गोरे, निखील बांगर, संतोष टेकाळे, गणेश शिंदे, संदीप वाकडे, संतोष साबळे उपस्थित होते. जिल्ह्यातील स्वयंरोजगार क्षेत्रातील सहकारी संस्थांच्या बळकटीकरणाला अधिक गती मिळावी यासाठी तसेच सभासदांचे प्रलंबित प्रश्न आणि अडचणी सोडवण्यासाठी ते सकारात्मक व प्रभावीपणे काम करणार असल्याचे नागरे यांनी यावेळी सांगितले. निवडीबद्दल खा रामराव वडकुते, आ. प्रज्ञा सातव, जिल्हाध्यक्ष गजानन घुगे आदींनी अभिनंदन केले आहे.

# नांदेड परिक्षेत्र उपमहानिरीक्षकांचा तक्रारदारांशी संवाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**

नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि १६ जुलै रोजी पोलिस अधीक्षक कार्यालयात तक्रारदारांशी संवाद साधला.

यावेळी ७ तक्रारदारांनी लिखीत अर्ज सादर केले. यात मालमत्ता विषयक वाद, अवैध व्यवसाय, दाखल गुन्ह्यांचा तपास आदींचा समावेश आहे. सदर प्राप्त तक्रारीची गांभीर्याने दखल घेवून त्यांच्या शीघ्र सोडवणुकीसाठी संबंधित उपविभागीय पोलिस अधिकारी व ठाणे प्रभारी यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी पोलिस अधीक्षक श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांची उपस्थिती होती.

# कार्यरत आशा वर्करांना पाहून आयुक्तांनी वाहन थांबवून साधला आस्थेवाईकपणे संवाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जुलै**

जिल्ह्याच्या शासकीय दौऱ्यावर असताना आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक (राष्ट्रीय आरोग्य अभियान) संजय काटकर यांनी ग्रामीण भागात कार्यरत 'आशा' स्वयंसेविकांशी रस्त्यात थांबून थेट संवाद साधत त्यांच्या कामाची पाहणी केली. त्यांच्या या सहज, संवेदनशील आणि आपुलकीपूर्ण संवादामुळे उपस्थित आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचारी भारावून गेले.

दौऱ्यादरम्यान रस्त्यावर कार्यरत असलेल्या आशा स्वयंसेविका दिसताच काटकर यांनी स्वतःचे वाहन थांबवून त्यांच्याशी संवाद साधला. आशा स्वयंसेविकांमार्फत नागरिकांना पुरविल्या जाणाऱ्या विविध आरोग्य सेवा, माता-बाल आरोग्य, लसीकरण, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे सर्वेक्षण, आरोग्य जनजागृती तसेच गावपातळीवर आरोग्य सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी आरोग्य सेविका, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांशी कसा समन्वय साधला जातो, याची त्यांनी सविस्तर माहिती घेतली. यावेळी आशा स्वयंसेविकांच्या अडचणी, अनुभव, सूचना आणि सेवा देताना येणाऱ्या आव्हानांबाबतही त्यांनी आत्मीयतेने विचारपूस केली. राज्याच्या सर्वोच्च आरोग्य प्रशासनातील अधिकारी स्वतः रस्त्यावर थांबून एवढ्या आपुलकीने संवाद साधत असल्याचे पाहून आशा स्वयंसेविकांनाही सुखद आश्चर्याचा धक्का बसला.

तळागाळातील आरोग्य व्यवस्था प्रत्यक्ष पाहण्याची त्यांची कार्यपद्धती, क्षेत्रीय कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधण्याची भूमिका आणि त्यांच्या कार्याचा सन्मान करण्याची संवेदनशीलता यामुळे हिंगोली जिल्ह्यात आयुक्त श्री. संजय काटकर यांच्या साधेपणा, लोकाभिमुख नेतृत्व आणि कर्तव्यनिष्ठेचा हा सुखद अनुभव ठरला. आरोग्य सेवेचा मजबूत पाया असलेल्या आशा स्वयंसेविकांचे मनोबल वाढविण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन संवाद साधणे ही प्रेरणादायी बाब असून, तळागाळापर्यंत गुणवत्तापूर्ण, लोककेंद्रित आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा पोहोचविण्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कटिबद्धतेचे हे प्रभावी उदाहरण मानले जात आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पालकमंत्री अतुल सावे यांनी विष्णुपूरी उड्डाणपुलाच्या घटनेची केली पाहणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ जुलै -**

नांदेड-लातूर राष्ट्रीय महामार्गावरील विष्णुपुरी येथे श्री गुरुगोबिंदसिंहजी अभियांत्रिकी महाविद्यालयासमोरील उड्डाणपुलाच्या बाजूचा खालचा भाग अचानक कोसळल्याच्या घटनेची राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी आज घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

या घटनेची शासनाने गांभीर्याने दखल घेतली असून, केंद्रीय उच्चस्तरीय तज्ज्ञ पथकाने दोन दिवसांपूर्वी घटनास्थळी भेट देऊन उड्डाणपुलाच्या संरचनेची सखोल तांत्रिक तपासणी केली आहे. चौकशीत बांधकामातील त्रुटी, निकृष्ट दर्जाचे साहित्य, कामातील निष्काळजीपणा अथवा संबंधित यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारची हयगय झाल्याचे आढळल्यास दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे पालकमंत्री सावे यांनी स्पष्ट केले.



पालकमंत्री सावे यांनी उड्डाणपुलाच्या कोसळलेल्या भागाची पाहणी करून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, संबंधित बांधकाम संस्था आणि जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून घटनेची सविस्तर माहिती घेतली. उड्डाणपुलाच्या उर्वरित संरचनेची सुरक्षितता, स्थिरता आणि गुणवत्तेची तपासणी करून आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

उड्डाणपुलाच्या बांधकामाची गुणवत्ता, वापरण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा, संरचनात्मक मजबुती तसेच तांत्रिक बाबींची सखोल तपासणी करण्यासाठी आयटीची टीम बोलावणार असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या आवश्यक ती दुरुस्ती, सुधारणा आणि पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने परिसरात पर्यायी मार्गाने वाहतूक सुरळीत सुरू ठेवण्यासाठी दक्षता घ्यावी. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा मोठी दुखापत झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला. भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी संपूर्ण उड्डाणपुलाची तांत्रिक तपासणी करण्यात येत असून चौकशी अहवालाच्या आधारे जबाबदारी निश्चित करून दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही पालकमंत्री अतुल सावे यांनी दिली.

यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार भीमराव केराम, आमदार राजेश पवार, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, संबंधित तांत्रिक अधिकारी, जिल्हा प्रशासन व पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची बदनामी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. १७ जुलै -**

राज्यातील ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाची सोशल मीडियाच्या माध्यमातून होत असलेली बदनामी थांबवून वादग्रस्त रविराज साबळे यांच्या विरुद्ध तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी ठाम मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन(डी.एन.ई.-१३६),जिल्हा शाखा नांदेड यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या एका व्हिडिओमध्ये राज्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी संवर्गावर अत्यंत बेजबाबदार, अपमानास्पद, अश्लील आणि बदनामीकारक स्वरूपाची वक्तव्ये करण्यात आली आहेत. कोणताही ठोस पुरावा न देता संपूर्ण ग्रामपंचायत यंत्रणेला भ्रष्ट ठरविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप युनियनने केला आहे. अशा प्रकारच्या विधानांमुळे राज्यभरातील हजारो प्रामाणिक ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या प्रतिमेला धक्का बसत असून समाजामध्ये शासन यंत्रणेबाबत अविश्वासाचे वातावरण निर्माण होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. युनियनच्या मते, ग्रामपंचायत अधिकारी हे ग्रामीण विकासाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणारे महत्त्वाचे घटक आहेत. मात्र काही व्यक्तींकडून संपूर्ण संवर्गाला लक्ष्य करून केले जाणारे बेछूट आरोप, शिवीगाळ व बदनामीकारक भाषा ही केवळ अधिकाऱ्यांचा अपमान नसून शासनाच्या प्रशासन व्यवस्थेची प्रतिमाही मलिन करणारी आहे.

या प्रकरणातील व्हिडिओची तसेच इतर डिजिटल पुराव्यांची तातडीने तपासणी करून रविराज साबळे यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच लागू असलेल्या माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून संबंधित बदनामीकारक व आक्षेपार्ह व्हिडिओ तात्काळ हटविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनने स्पष्ट केले आहे की, काही अपवादात्मक घटनांच्या आधारावर संपूर्ण अधिकारी वर्गाला बदनाम करणे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही. शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई केल्यास प्रशासनाविषयी नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल आणि भविष्यात अशा प्रकारच्या बेजबाबदार व बदनामीकारक कृत्यांना आळा बसेल, अशी अपेक्षा युनियनने व्यक्त केली आहे.यावेळी जिल्हाध्यक्ष अमृतराव शिंदे, सरचिटणीस धम्मानंद धोत्रे, कार्याध्यक्ष श्रीनिवास मुगावे,शेख नजीर,ग्रामविकास अधिकारी सुनील हाळदेवाड,पी डी वाघमारे, उत्तरवाड यांच्यासह युनियन च्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## किनवट शहरासाठी सिटी सर्व्हे करावा : गटनेते श्रीनिवास नेम्मानीवार

**किनवट** -महाराष्ट्र शासनाच्या २६ मे २०२६ च्या शासन निर्णयानुसार किनवट शहराचा नवीन सिटी सर्व्हे (नगर भूमापन) करून नागरिकांना



अद्ययावत प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने सुरू करावी, अशी मागणी भाजपचे गटनेते तथा माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास किशनराव नेम्मानीवार यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे केली. निवेदनात किनवट शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता मालमत्तेवरील वाद, बँक कर्जातील अडचणी आणि खरेदी-विक्री व्यवहारातील फसवणूक टाळण्यासाठी सिटी सर्व्हे अत्यावश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच आगामी सर्वसाधारण सभेत हा विषय मंजूर करून प्रस्ताव जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, नांदेड यांच्याकडे तातडीने पाठविण्याची मागणी करण्यात आली आहे. या सर्वेक्षणासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी आमदार भीमराव केराम यांनी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिल्याचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला आहे.

## पत्रकार संरक्षण समितीच्या देगलूर तालुकाध्यक्षपदी गजानन टेकाळे

**देगलूर** -पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, सामाजिक बांधिलकी आणि संघटन कौशल्याची दखल घेत देगलूर टाइम्सचे संपादक गजानन टेकाळे यांची पत्रकार संरक्षण समिती (महाराष्ट्र), नांदेड जिल्हा यांच्या वतीने देगलूर तालुकाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



या नियुक्तीचे पत्र पत्रकार संरक्षण समितीचे नांदेड जिल्हाध्यक्ष महेंद्र गायकवाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. नियुक्तीपत्राद्वारे पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांच्या समस्या, अडचणी आणि हक्कांसाठी कार्य करणे, पत्रकारांचे हित जपणे, तालुकास्तरावर संघटनेचा विस्तार करणे, नवोदित पत्रकारांना संघटनेशी जोडणे तसेच सामाजिक बांधिलकी जपत समितीची उद्दिष्टे प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. गजानन टेकाळे यांनी मागील दोन ते तीन वर्षांपासून पत्रकार संरक्षण समितीत सक्रियपणे कार्य केले आहे. त्यांनी सुरुवातीला कार्याध्यक्ष, त्यानंतर सचिव म्हणून जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत आता त्यांची देगलूर तालुकाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली देगलूर तालुक्यातील पत्रकारांना न्याय, संरक्षण, मार्गदर्शन आणि संघटनात्मक बळ मिळेल तसेच पत्रकार संरक्षण समितीचे कार्य अधिक प्रभावी, गतिमान आणि लोकाभिमुख होईल, असा विश्वास जिल्हाध्यक्ष महेंद्र गायकवाड यांनी व्यक्त केला. या नियुक्तीबद्दल पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून गजानन टेकाळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दरम्यान, देगलूर तालुका पत्रकार संरक्षण समितीची कार्यकारिणी लवकरच पुनर्गठित करण्यात येणार असून पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी संघटना अधिक जोमाने कार्य करेल, अशी ग्वाही नवनियुक्त तालुकाध्यक्ष गजानन टेकाळे यांनी दिली.

## व्हॉईस ऑफ मीडियाच्या जिल्हाध्यक्षपदी नरेश दंडवते

**नांदेड** -पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी कार्यरत असलेल्या व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेच्या नांदेड जिल्हा कार्यकारिणीची निवड बुधवारी पार पडली. प्रदेश कोषाध्यक्ष विजय चोरडीया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांची घोषणा



करण्यात आली. या निवडीतजिल्हाध्यक्षपदी नरेश दंडवते तरपालक सचिवपदी डॉ. गणेश जोशी, यांची निवड करण्यात आली. व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघटना जिल्हा नांदेड या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारांचे विविध प्रश्न सोडविणे, पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटितपणे काम करणे आणि पत्रकार कल्याणासाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. नवीन कार्यकारिणीत महानगराध्यक्षपदी दिलीप शिंदे, कार्याध्यक्षपदी तुकाराम सावंत, दक्षिण जिल्हाध्यक्षपदी शिवाजी राजुरकर, उत्तर जिल्हाध्यक्षपदी संगमेश्वर बाचे, तर दक्षिण जिल्हा उपाध्यक्षपदी नागेश कल्याण यांची निवड करण्यात आली. तसेच ऋषिकेश कोंडेकर आणि बाळासाहेब पांडे यांच्याकडे मराठवाडा उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. बैठकीस गंगाधर ढवळे, भास्कर जामकर, नारायण यम्मेवार, शरद काटकर, प्रा. निवृत्ती भागवत, शेख शबीर, संतोष पांडवे, संभाजी सोनकांबळे, पठाण जलील, अशोक लोणीकर, शाकेर काझी, अजित पवार, डॉ. प्रविणकुमार सेलुकर, आगाखान पठाण, राज गायकवाड, रुपेश राचलवाड, संभाजी वाघमारे, गौतम एडके यांच्यासह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नांदेड- पंढरपूर वारी दरम्यान आज सातारा येथे सातारा लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले साहेब यांची माजी खासदार तथा विधिमंडळ उपविधान समितीचे समिती प्रमुख प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशराव पाटील सावळे, माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव बारसे, माजी जिल्हा परिषद सदस्य विनायकराव पा.शिंदे मांजरमकर, सुरेश राठोड आदींची उपस्थिती होती.**

# ग्रामीण भागातील अन्यायकारक रात्रीची लोडशेडिंग तात्काळ बंद करावी : आ. कोहळीकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ जुलै -**

हदगाव- हिमायतनगर तालुक्यासह नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रात्रीच्या वेळेस होणारी लोडशेडिंग मुळे नागरिकांना, शेतकरी, विद्यार्थी व महिला वर्गांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून यासह सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण होत असून ही अन्यायकारक लोड शेडिंग तात्काळ बंद करण्याची ठाम मागणी आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे मुख्य अभियंता, नांदेड यांच्याकडे केली आहे.

पुढे आ. कोहळीकर यांनी निवेदनाद्वारे मागणी केली की, रात्री करण्यात येणाऱ्या लोडशेडिंग मुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून पावसाळ्यात साप, विंचू व इतर विषारी प्राण्यांचा वावर वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षतीतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून शेतकरी, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक व सर्वसामान्य जनतेला मोठ्या गैरसोयीचा फटका बसत आहे. ग्रामीण व शहरी भागातील सर्व ग्राहक हे महावितरणचे असताना शहरी भागाला एक न्याय व ग्रामीण भागाला वेगळ्या न्याय का ? ग्रामीण भागात काय जनावर राहतात काय ? असा प्रश्न



पडला असून ही लोड शेडिंग अपरिहार्य असल्याने ती रात्री न करता दिवसा तसेच एक दिवस ग्रामीण भाग व एक दिवस शहरी भाग अशा पद्धतीने समान लोड शेडिंग करण्यात यावी तसेच ग्रामीण भागातील रात्रीची लोड शेडिंग तात्काळ बंद करून शहरी भागाप्रमाणे अखंडित वीजपुरवठा सुरळीत देण्यात यावे अशी मागणी आमदार कोहळीकरांच्या वतीने करण्यात आली.

# सरसेनापती नेताजी पालकर स्मारकासाठी एक कोटी रुपयांचा निधी



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ जुलै -**

छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रमी सरसेनापती नेताजी पालकर यांच्या हदगाव तालुक्यातील तामसा येथील ऐतिहासिक समाधी स्थळाचा विकास करून भव्य स्मारक उभारण्यात येणार असून, त्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केली.

तामसा येथील समाधी स्थळाच्या विकासासाठी छावा मराठा संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री अतुल सावे यांनी आंदोलकांच्या शिष्टमंडळाशी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात चर्चा केली. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण व मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी तामसा परिसराचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करत स्मारक उभारणीसाठी शासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी केली.

यावेळी शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्मारक सल्लागार समिती, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन व आढावा समिती स्थापन करणे, स्मारकाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणे तसेच प्रकल्प व्यवस्थापन समिती (पीएमसी) गठीत करण्याबाबत मागणी केली. शिष्टमंडळाच्या निवेदनाची दखल घेत पालकमंत्री श्री. सावे यांनी स्मारक उभारणीबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून स्मारकाच्या उभारणीस गती देण्यात येईल. तसेच यासाठी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार राजेश पवार, आमदार भीमराव केराम, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीस किशोर चव्हाण, डॉ. राजेंद्र दाते पाटील, इंजि. तानाजी हुस्सेकर, कामाजी पवार, सुनंदा जोगदंड, डॉ. प्रभाकर जाधव, दीपक पावडे, दीपक राजुरकर, कैलास शिंदे, बबन पाटील, संजय हंबर्डे, सुनील कदम, दशरथ कपाटे, शिवानंद पाटील, विश्वजीत जाधव यांच्यासह शिवप्रेमी उपस्थित होते.

## नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक पदी शिवराम लुटे यांची बिनविरोध निवड



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १७ जुलै -**

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील अधिकारी व कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे संचालक व अध्यक्षपदाचे काम काज २५ वर्षापासून यशस्वीरित्या पार पाडणारे शिवराम लुटे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचा अभिनंदन होत आहे.

माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अधिकारी व कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे संचालक शिवराम लुटे हे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. शिवराम लुटे हे सन २०२१ ते २०२५ या कालावधीमध्ये मध्यवर्ती बँकेचे संचालक म्हणून कार्यरत होते . व तसेच स्वारातिम विद्यापीठ येथील पतसंस्थेचे गेली २५ वर्षापासून संचालक पदी काम करत आहेत. या मोठ्या अनुभवाचा फायदा त्यांना झाला असल्यामुळे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा एकदा संचालक पदी काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल साहेबांचे मनःपूर्वक अभिनंदन शिवराम लुटे यांनी केले. यावेळी या निवडीबद्दल विद्यापीठातील जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, गोविंद हंबर्डे, जयसिंग हंबर्डे, सुरेश मोरे, साईनाथ मामीडवार, सुशील खरवडकर आदी मित्रमंडळीने अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू भाग्यश्री जाधव यांच्या संघर्षमय जीवनाचा प्रवास शालेय अभ्यासक्रमामध्ये

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ जुलै -**

येथील भूमीकन्या, महाराष्ट्र भूषण आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू भाग्यश्री जाधव यांच्या संघर्षमय जीवनाचा प्रवास उलगडून दाखविणारा धडा बालभारती या इंग्रजी माध्यमाच्या ग्रेड थ्री या शालेय अभ्यासक्रमात यावर्षीपासून समाविष्ट करण्यात आला आहे.

अवघ्या अकरा वर्षाच्या क्रीडा प्रवासात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धेत गोळाफेक व भालाफेक या क्रीडा प्रकारात पदकांची लयलूट करून सर्वोच्च स्थान निर्माण करणाऱ्या नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील होनवडज येथील रहिवाशी असलेली भाग्यश्री माधवराव जाधव यांचा जीवन प्रवास संघर्षमय असून एकाद्या चित्रपटाच्या कथानकाप्रमाणे आहे.

पॅरा ऑलिम्पिक व वर्ल्ड चॅम्पियन शिप स्पर्धेत महाराष्ट्र बरोबरच भारताचे प्रतिनिधित्व



2.8 Struggler : Bhagyashree Jadhav

Do you know?
- About indoor and outdoor games? Which are your favourite games?
- Sports personalities.

(1) Read aloud.

Bhagyashree Jadhav comes from a middle-class family of a farmer. She was born on 24th May 1985 in a small village named Honwadaj, Mukhed in Nanded district. In 2006, she met with an accident that left her disabled and dependent. She took support of a wheel chair for the rest of her life. She went into coma for thirteen days. No one thought that she would live anymore. But will-power of Bhagyashree defeated death. But unfortunately, both her legs became disabled from the waist. She suddenly became disabled in her youth and her life went into the shadow of darkness.

In the beginning, she wanted to become a teacher, but after her father's death, her dream remained unfulfilled. She resolved to become self-reliant and fight back. Leaving the village of Honwadaj, she took admission in a girl's hostel at Nanded to complete her higher education. When she was in trouble, Mr. Prakash Kamble, a journalist helped and encouraged her to participate in sports competitions meant for disabled.

In the Mayor's Cup Sports Competition held in Pune in 2017, she won gold medals in Shot Put and Javelin Throw and a bronze medal in Discus Throw. In 2018, she won a gold medal in Shot Put at state-level sports competition held in Kolhapur. While this sports journey was going on, she completed her

दोन वेळा भाग्यश्री जाधव यांनी केलेले आहे. नुकत्याच झालेल्या वर्ल्ड पॅरा ऑलम्पिक स्पर्धेत भारताची ध्वजवाहक होण्याचा बहुमान देखील त्यांना मिळालेला आहे.महाराष्ट्र शासनाने त्यांच्या कामगिरीची दखल घेत शिवछत्रपती पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला आहे.त्याचबरोबर मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी या पदी त्यांची नियुक्ती देखील केलेली आहे.

भाग्यश्री जाधव यांच्या संघर्षमय जीवन व यशोगाथा यांची दखल राज्य शासनाच्या बालभारती अभ्यासक्रम समितीने घेतली आहे. त्यांच्या जीवनावरील धडा इंग्रजी माध्यमाच्या ग्रेड थ्री या शालेय अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट केला आहे.

बालभारतीच्या पुस्तकातील पान क्रमांक ३९ वर युनिट टू मध्ये स्ट्रगलर भाग्यश्री जाधव या शीर्षकाखाली त्यांच्या जीवनाचा प्रवास उलगडून दाखविण्यात आला आहे.त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी भाग्यश्री जाधव यांच्या बद्दल काही प्रश्न देखील विचारण्यात आले आहे.

विशेष म्हणजे भाग्यश्री जाधव यांच्या जीवनाला कलाटणी देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारे त्यांचे प्रेरणास्थान ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कांबळे यांच्या मोलाच्या सहकार्याबद्दलची नोंद देखील सदरील धड्यामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्याच्या अखिल जगात डंका वाजविणाऱ्या महाराष्ट्र भूषण भाग्यश्री जाधव शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट होणाऱ्या नांदेड जिल्ह्यातील पहिल्या खेळाडू आहेत. क्रीडा इतिहासात अजरामर ठरणाऱ्या भाग्यश्री जाधव यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

आपला जीवन प्रवास उलगडून दाखवून शालेय विद्यार्थ्यांना प्रेरणात देण्यासाठी अमोल सहकार्य करणारे बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक, इंग्रजी अभ्यासक्रम समितीचे अध्यक्ष संजय पवार, सदस्य शिवाजी कराळे यांच्यासह सर्व सदस्य यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

